म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक

सन

संग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव

म. ग्रं. सं. ठाणें
विषय कादंबरी
सं. नं. ७६८

# चतुर लोकांच्या नकला.

अथवा

# चातुर्य दर्शक मौजेच्या गोष्टी.

भाग १ला.

व्यंकटेश विठ्ठल पै यांनीं सर्व हक्कासह विकत घेऊन छापून प्रसिद्ध केला. सन १८९२.

किंमत ६ आणे.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय कादंबरी
सं. नं. ७६८

# कांच्या नकला,

अथवा

## चातुर्यदर्शक मनोरंजक गोष्टी.

भाग पहिला.

हें पुस्तक

गोविंद मोरोबा कारलेकर
यांनीं तयार केलें

तें

व्यंकटेश विठ्ठल पै
यांणीं
मुंबईंत
प्रबोध रत्नाकर छापखान्यांत छापविलें.

सन १८९२.

किंमत ६ आणे.

ह्या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क पुस्तक प्रसिद्धकर्त्यानें
आपले स्वाधीन ठेविले आहेत.

# प्रस्तावना

आजपर्यंत मराठी भाषेंत जे अनेक ग्रंथ छापून प्रसिद्ध झाले आहेत त्यांत लोकांचें मनरंजन होऊनही त्यांस, चातुर्य, कल्पना, समयसुचकता व तर्कज्ञान, यांचा बोध होऊन, त्या योगानें त्यांस व्यवहार ज्ञानाचा लाभही करून घेतां यावा अशा उद्देशाचे ग्रंथ फारच थोडेसे आढळतात, असें जाणून तशा प्रकारचे जे थोडके ग्रंथ झाले आहेत त्यांच्या भरतीमध्यें आपणही एक लहानसा ग्रंथ तयार करून घालावा या उद्देशानें आज हें " चतुर लोकांच्या नकला नामक" पुस्तक जनसमूहा पुढें प्रसिद्धीस आणिलें आहे.

यांतील सर्वच गोष्टी चातुर्याच्याच असून त्यांपासून वाचकांचें मनरंजन होईल इतकेंच नाहीं तर त्यांची अक्कल-हुशारी तर्कज्ञान प्रसंगावधान व कल्पना शक्ती वाढण्याचें एक साधनही होईल.

या पुस्तकास चांगला लोकाश्रय मिळाला तर लौकरच याचा दुसरा भागही छापून प्रसिद्ध करूं.

पुस्तक कर्ता.

# अनुक्रमणिका.


विषय. पृष्ठ.

१ एका प्रवाशाचा चतुरपणा अथवा भली खोड मोडली .... .... .... १
२ एका गोष्टींत पुष्कळ लाभ अथवा वर मागण्याचें चातुर्य. .... .... .... ५
३ समयसूचकता अथवा एका वैद्याचें चातुर्य. .... ६
४ एका प्रधानाचें चातुर्य. .... .... ९
५ न्याय करण्याचें अलौकिक चातुर्य. .... २२
६ बिरबलाचें चातुर्य. .... .... .... ३१
७ एका कारकुनाचें चातुर्य. .... .... ३९
८ एका बादशहाचा मूर्खपणा व एका वैद्याचें चातुर्य.... ४१
९ एका भामट्याचें चातुर्य .... .... ४६
१० अक्कल विकणाऱ्या दुकानदाराचें चातुर्य .... ४८
११ चोरी पकडण्याची युक्ती. .... .... ५४
१२ बिरबलाची अक्कल .... .... .... ६५
१३ उद्योग व चातुर्य .... .... .... ६९

# चतुर लोकांच्या नकला

अथवा

# चातुर्य दर्शक मनोरंजक गोष्टी.

भाग १ ला.

## गोष्ट १ ली.

### एका प्रवाशाचा चतुरपणा

अथवा

### भली खोड मोडली.

बऱ्याच वर्षांवर पंढरपुर मुकामीं एक खाणावळ होती, तिच्या चौकाजवळ प्रवाशी लोकांच्या गाड्या बदलत असत. त्यावेळीं आगगाड्या नसल्या कारणानें ह्या ठिकाणीं बैल गाड्यांचा टप्पा पुरा होऊन नवीन सुरू होत होता. ह्या टप्प्यावर उतरलेले उतारु तत्क्षणीं खाणावळींत जाऊन जेवावयास बसले नाहींत तों नवीन गाड्या तयार होत असत.

खाणावळवाला ठक असल्या कारणानें प्रत्येक जेवणारा जवळून बरेच पैसे घेत असतांही त्या बिचाऱ्यांनीं दोनचार घांस

तोंडांत टाकले नाहींत इतक्यांत त्यांस जेवणावरून उठावें लागत असे, कारण कीं जेवणास अधिक वेळ लाविला तर गाड्या निघून जाऊन दुसऱ्या दिवसापर्यंत रखडावें लागत असे, अशी ही कुरकुर होती कीं, गाडीवाले त्यास मिलाफी होते ह्मणून उतारू जेवावयास बसले कीं, गाडीवाले घांट वांजवून सर्वांस कळवित कीं, "गाड्या निघून जातात याकरितां लवकर लवकर चला."

एके दिवशीं कांहीं उतारू जेवावयास बसले असतां एका मनुष्यानें सर्वांस सूचना केली कीं, जेवणें असेल तर लवकर जेऊन घ्या नाहीं तर गाड्या निघून जाऊन तुह्मी येथेंच रखडत राहाल. असें ह्मणून त्यानें खाणावळवाल्याची फसवणुकीची गोष्ट त्यास सांगितली ती ऐकून सर्व लोक वाबरून गेले, पण त्यांत एक धूर्तखंद्या गडी बसला होता तो प्रतिज्ञेनें ह्मणूं लागला "मी खऱ्या आईबापांच्या पोटचा असेन तर मी दिलेल्या पैशाचा माल खाऊन सोसेल तर तुमच्या सर्वांच्या वांट्याचेंही खाईन, आणि नंतर येथून उठेन." हें ऐकून एकजण ह्मणाला "तर गाडी चुकून तूं येथेंच राहशील." खंद्या ह्मणाला—कधीं नाहीं, मी खरा असेन तर इतकें करून ही तुह्मां सर्वांच्या बरोबरच गाडींत बसेन.

इतकें झाल्यावर सर्व लोक जेवावयास बसले आणि एक-

दोन घांस तोंडांत टाकलें नाहींत इतक्यांत त्यांस नियमाप्रमाणें सूचना मिळाली त्याबरोबर सर्व लोक अर्धेंच जेवण टाकून तडफडत तडफडत गाडीवर जाऊन बसले पण तो खंद्या गडी पाटा वरून उठलाच नाहीं. खाणावळवाल्यानें त्यास सांगितलें "ऊठ, नाहीं तर गाड्या निघून जाऊन तूं येथेंच रखडत रहाशील" पण त्यानें त्याच्या बोलण्याकडे मुळींच लक्ष नदेतां पात्रावर जितकें अन्न होतें तितकें खाऊन फस्त केलें. गाड्या निघून गेल्या तरी त्या विषयीं कांहींच पर्वा न करतां पुन्हां पुन्हां निरनिराळे पदार्थ मागवूं लागला. तेणें करून खाणावळवालाही अगदीं कंटाळून गेला आणि हा कोणी आपल्या माथ्याचाच मिळाला आहे असें समजला. शेवटीं त्या खंद्यानें दूध मागितलें म्हणून खाणावळवाला वाटी पाहूं लागला, पण त्याला एकही वाटी मिळाली नाहीं, तेव्हां तो शोध करूं लागला. तेव्हां खंद्यागडी ह्मणाला—उतारू लोकांनीं जेवणासाठीं पैसे दिले त्याच्या निम्मे इतकें ही त्यांस खावयास न सांपडल्या कारणानें ते वाट्या घेऊन गेले असतील. असें ऐकतांच खाणावळवाल्यानें आपल्या एका मनुष्यास घोड्यांवर बसवून गाड्या परत आणण्यास पाठविलें. गाड्या तीन मैल पुढें गेल्या होत्या. गाडीवाले त्यास मिळाफी असल्या कारणानें तो मनुष्य पोहोचताच त्यांनीं गाड्या

परत फिरविल्या. गाड्या खाणावळी जवळ येऊन पोंचतांच तो धूर्तगडी आपल्या मित्रांस "रामराम करून गाडींत जाऊन बसला." खाणावळवाल्यानें त्यांस विचारिलें. ह्यांतून माझ्या वाट्या कोणी चोरल्या तें सांग.

धूर्तगडी ह्मणाला—अरे भल्या माणसा, मजपासून सोन्यासारखे पैसे घेतले असून मला पोटभर सुद्धां अन्न मिळूं नये काय? जा तुझ्या वाट्या कोणी चोरल्या नाहींत त्या सर्व दुधाच्या तपेल्यांत अनामत आहेत. चलाव गाडीवाल्या आतां खोटी कुणाची?

खरोखर सर्व वाट्या त्याच गड्यानें लपविल्या होत्या त्यानें जर तसें केलें नसतें तर पोटभर अन्न न मिळतां गाडी चुकली असती. गाडींत बसलेल्या लोकांनीं त्या धूर्त गड्यानें आपली प्रतिज्ञा शेवटास नेलेली पाहून त्यांस मोठें आश्चर्य वाटलें आणि पोटभर जेऊन आपणा बरोबर गाडींत बसण्यासाठीं त्यानें जी युक्ती लढविली तिजबद्दल त्याची तारीफ करूं लागले. व त्या खाणावळवाल्याची "भली खोड मोडली" असें सर्व लोक ह्मणाले.

## गोष्ट २ री.

### एका गोष्टींत पुष्कळ लाभ
### अथवा
### वर मागण्याचें चातुर्य.

कोणी एक ब्राह्मण अतिदरिद्री व अंध होता. त्याच्या मनांत आलें कीं आपण जन्मास येऊन प्रापंचिक सुखाचा मुळींच अनुभव घेतला नाहीं, व परमार्थाचेंही कांहीं एक साधन केलें नाहीं; तस्मात आपला जन्म व्यर्थ आहे. अशा प्रकारें फार खिन्न होऊन, आतां कांहीं तरी देवाची आराधना करावी व पुण्य जोडावें, असें मनांत आणून गावा बाहेर एक देवाचें देवालय होतें तेथें जाऊन एक निष्ठेनें तप करीत बसला कांहीं दिवस लोटल्यावर देवी प्रगट होऊन त्यास ह्मणाली, हे ब्राह्मणा, तुझी माझे ठायीं निष्ठा पाहून मी तुजवर प्रसन्न झालें; पण तुझ्या अन्य जन्मार्जित पातकामुळें तुला सर्व गोष्टीं ची प्रतिकूलता आहे त्या सर्व तुला देण्यास मी प्रस्तुत समर्थ नाहीं. पण तुला पाहिजे तर एक वर मी देते. तेवढ्यानें तुझें कार्य होईल तर होईल; असें देवीचें भाषण त्या चतुर

ब्राह्मणानें श्रवण करून, तो तीस ह्मणाला, जगदंबे, माते, माझ्या दुर्दैवा पुढें तुझा इलाज नाहीं तर तुझ्या ह्मणण्या प्रमाणें मी एकच वर मागतों तो हा कीं मी आपल्या पणतूच्या मस्तकावर राज छत्र पहावें एवढे मात्र मला दे. बाकी माझ्या सर्व गोष्टी प्रतिकूळ आहेत त्यांची भीड मी तुला घालीत नाहीं. " एका वरांत ब्राह्मणानें किती वराचें साधन केलें पहा. " " पहावें " ह्मटल्यानें डोळे मागीतलेच " पणतुच्या " ह्मटल्यानें बायको पुत्र नातु ह्यांचा समावेष अर्थात झाला " राज छत्र " ह्मटल्यानें संपती आलीच व " मीं पहावें " ह्मटल्यानें आयुष्य वृद्धिही मागितलीच मग देवीनें त्याचें चातुर्य पाहून तथास्तु ह्मणून त्याचा मनोरथ पूर्ण केला. सारांश त्या चतुर ब्राह्मणानें एकाच गोष्टींत पुष्कळ लाभ करून घेतला.

---

## गोष्ट ३ री.

### समयसूचकता
### अथवा
### एका वैद्याचें चातुर्य.

एके तरुण बाईचा पाय निसटून ती विहिरींत पडली, ती

विहीर अगदीं कोरडी होती तेथें जवळच कांहीं मनुष्यें काम करीत होतीं, त्यांनीं तिला बाहेर काढिली तों ती अगदीं बेसावध असून श्वासोश्वास अगदीं बंद आहे असें वाटलें. ही बाई शरीरानें सशक्त लठ्ठ अशी होती कोणी हिच्या डोळ्यास पाणी लाविलें, टाळूवर अंगावर शिंपडीलें, परंतु ही सावध होईना. भोंवताली पुष्कळ गर्दी जमली होती, त्यांच्यामनास वाटलेंकीं ही एकदम आपटल्यामुळें हिची अशी अवस्था झाली आहे. ह्या वेळेस नाडी विषयीं काय? पण श्वासोश्वास चालू आहे कीं नाहीं, या विषयीं संशयच होता. इतक्यांत एक मुसलमान हाकीम तेथें आला त्यानें ह्या रस्त्यावर मंडळीचा जमाव पाहिला तों आंत ही अशी अवस्था. त्यानें तिला पाहिलें व ह्मणाला, ही पडल्या मुळें बेसावध झाली नाहीं. घेरी येऊन बेहोष झाल्यानें पडली आहे व ही एक प्रकारची मुर्छा आहे. तुमची सगळ्यांची आशा तुटली असली व परवानगी देत असलां तर मी इलाज करितों.

तेव्हां सगळ्यांनीं सांगितलें कीं आतां ईलाज कशाचा करितां? येथें काय बाकी आहे. पहा बुवा उपाय करून नाहीं का ह्मणावें! असें ह्मणतांच हाकीमानें पटकन एकशस्त्र काढिलें व हातांच्या आणि पायाच्या मिळून चार शिरा तोडल्या तोडतांच रक्तप्रवाह सुरू झाला व चटकन चलन वलन शक्ती

येऊन शुध्धीवर आली नंतर कांहीं उपाय करून शिरांचीं तोंडें वगैरे कांहीं युक्तीनें बांधिली सर्व लोकांस हें कृत्य पाहून सर्वांस मोठें आश्चर्य वाटलें व ते ह्मणाले. हाकीम साहेब हें काय झालें होतें व आपण उपचार काय समजून केला! नंतर हाकीमानें सांगितलें या रोग्याची जशी स्थिती होती अशी स्थिती पाहून वैद्यही फसतात. मग तुमचें नवल काय? अशा स्थितींत लवकर योग्य उपाय न झाल्यास मृत्युच यावयाचा लोकांस वाटतें कीं हा रोगी पडल्या मुळें लागून आघातानें बेसावध झाला असेल परंतु तसें नाहीं; हा रोगच निराळा, याचें तुमच्यांत रक्तजमूर्छा हें नांव आहे.

पाहिजे असल्यास त्या बाईला विचारूं, तिला याच्या पूर्वी थोडें डोकें दुखणें, आंगावर मुंगी चावल्याचाभास, भोंड, थोडिशी विस्मृति किंचित बहिरेपणा, कानांत कांहीं आवाज होतो आहे असें वाटणें इत्यादि लक्षणांपैकीं बहुतेक लक्षणें होत असलीं पाहिजेत. व तिला हें विचाराकीं, तुला घेरी आल्यामुळें तूं पडलीस किंवा पाय निसटून पडलीस ? ह्मणजे तुमची खात्री होईल, ती घेरी येऊन पडली असावी. मंडळीनें तिला विचारिलें तों खरेंच पूर्वी लक्षणें हीं बहुतेक होत असत. व घेरीही आली होती. हकीम ह्मणाला, हें ओळखून अशा रितींनें रक्तमोक्ष करणें अवश्य आहे कीं नाहीं हें ठरविणें अ-

कलेचें व चातुर्याचें काम आहे. नाहीं तर हा उपचारच मारक व्हावयाचा.

इतक्यांत तिच्या घरच्या माणसांस खबर कळून तीं रडत ओरडत धांवतच आलीं व येथें हें असें कृत्य पाहिलें तेणें करून त्यांस अत्यानंद झाला. नंतर हाकीमानें पुढें काय उपचार करावयाचे व खाण्या पिण्याची व्यवस्था कसी ठेवावयाची हें सांगितलें. सर्व मंडळीनें हाकीमाची फारस्तुती केली व त्या बाईच्या माणसांनीं त्यास घरीं नेऊन यथाशक्ती द्रव्य देऊन त्याचे फार आभार मानिले. सारांश त्या वैद्यानें आपलया समयसुचकतेच्या योगानेंच त्या बाईचा हात मोकळा केला.

## गोष्ट ४ थी.

### एका प्रधानाचे चातुर्य.

चंद्रपुरचा राजा भीमसेन यानें एके दिवशीं रोहसेन ह्मणून उदेपूरचा मांडलिक राजा होता. त्यास पत्र पाठविलें कीं, हें पत्र पोहचतांच, " कमअस्सलका अस्सल, अस्सलका कमअस्सल, बजारका कुत्ता, आणि गादीका गद्धा " हे चार जिन्नस पाठऊन द्यावे. न पाठवाल तर युद्धास तयार व्हावें. अशा मजकुराचें पत्र राजाचे शिपाई घेऊन आले. आणि त्यांनीं

राजाचे भालदारास सांगितलें कीं, राजाचे शिपायी आले आहेत. अशी राजाजवळ वर्दी लावा. त्या प्रमाणें भालदारानें राजाजवळ वर्दी लाविली; तेंव्हां राजानें आंत येण्याविषयीं त्यांस परवानगी दिली. नंतर लागलेच शिपायी कचेरींत आले आणि मुजरा करून बादशाहाचें पत्र दिलें तें फोडून वांचतांच त्यांत लिहिलेल्या जिन्नसा मिळणें फार कठीण असें वाटून त्याचे मुखावर म्लानता आली व स्तब्ध बसला. इतक्यांत त्याचा प्रधान तेथें आला आणि पहातो तों राजा कांहीं तरी मोठ्या चिंतेंत पडला आहे, असें भासलें तेंव्हां राज्यास त्यानें नम्रपणें विचारिलें, महाराज असें आपणांस कोणतें संकट प्राप्त झालें आहे? एखादें परचक्र आलें कीं काय? असेल तर सांगावें त्याचा मी आपल्या स्वल्प बुद्धीनें परिहार करीन. असें ऐकून राजास धीर आला. आणि चंद्रपुरचे राजाकडून आलेलें पत्र त्याचे हातीं देऊन 'हें वाचून पहा' असें सांगितलें. नंतर प्रधानानें वाचून पाहिलें आणि बोलला कीं यांत काय आहे? या चार जिन्नसा मिळणें कांहीं कठीण नाहीं; परंतु यास कांहीं दिवस अवकाश लागेल, याजकरितां राजापासून एक वर्षाची मुदत घ्यावी हें ऐकून राजास मोठा आनंद झाला आणि राजाजवळ एक वर्षाची मुदत मागितली. त्याप्रमाणें चंद्रपुरच्या राजानें दिली. तेंव्हां प्रधान बोलला या जिनसा

मिळण्यास एक लक्ष रुपये खर्चावयास पाहिजेत ते मिळावेत; राजानें उत्तर केलें, पाहिजेत तितके घ्यावे नंतर प्रधानानें एक लक्ष रुपये घेतले आणि सावकाराचें सोंग घेऊन त्या बादशाहाचे नगरांत आला आणि शहरांत कोतवाल चावडी समोर एक उत्तम प्रकारची हवेली भाड्यानें विकत घेतली आणि मोठा व्यापार चालविला. नंतर कोतवाला बरोबर आपली सलगी ठेऊं लागला. त्यास दररोज आपल्या बंगल्यांत बोलवावें; पानसुपारी द्यावी; मिठाई द्यावी; नाच तमाशे करावे असें चालल्यामुळें कोतवालाशी फारच स्नेह झाला. मग कोतवालानें असा क्रम चालविला कीं, गावांत कळवांतीण, कसबीण, गवई, नाच, तमाशेवाले, हारीदास, इत्यादि कोणी आले असतां, त्यास सावकाराकडे आणावें गायनादि करवावें आणि "अमुक विदामी द्या असें सांगतांच सावकारानें द्यावी. याप्रमाणें क्रम चालविला असें होतां होतां एके दिवशीं एक सुंदर कळवांतीण सोळा वर्षांचे उमेदीची असी कोतवालाकडे आली. नंतर त्यानें तिला सावकाराकडे आणिली आणि सांगितलें कीं ही उत्तम प्रकारची सुस्वर गाणारी व नाचणारी आहे, तेव्हां हीची बैठक करवून नाचही करविला पाहिजे. असें ऐकतांच सावकारानें, ठीक आहे नाच करवावा. असें ह्मणून तिजकडून नाच वगैरे करविला.

त्यासमयीं तिनें अशाप्रकारचा नाच केला कीं, तेणें करून सावकारानें खुष होऊन कोतवालास विचारिलें " मेहरबान, हिला काय विदागी द्यावी ? कोतवालानें उत्तर केलें, दोनशें रुपये द्यावे. त्याप्रमाणें सावकारानें दोनशें रुपये पेटींतून काढून तिला दिले, त्या वेळेस तिला आश्चर्य वाटलें आणि मनांत ह्मणाली कीं मला कोणीच आजपर्यंत दोनशें रुपये दिले नाहींत, पांचा पासून वीस ह्मणजे फार, असे आजपर्यंत मिळत गेले, परंतु, दोनशें देणारा कोणीच भेटला नाहीं. याजकरितां आतां दुसरी कडे जाऊं नये, असा जो दोनशें रुपये देणारा त्याजवळ आपण आसावें असा विचार करून सावकारास ह्मणाली, मी आपणा जवळ राहणार, दुसरीकडेस जात नाहीं. तेव्हां कृपा करून मला आपण ठेवावें. सावकारानें उत्तर केलें, " बरें आहे. " असें ऐकून ती आपल्या बंगल्यावर सावकारास घेऊन गेली आणि नानाप्रकारच्या आनंदाच्या गोष्टी केल्या; अशांतच सर्व रात्र संपून गेली. तेव्हां तो आपले बंगल्यावर जाण्या करितां निघाला; तों तिनें ह्मटलें, माझा मनोरथ सिद्धीस गेला नाहीं. तेव्हां त्यानें उत्तर केलें आतांच काय आहे, आह्मी येथें आहोंच, पाहिजे तेव्हां तुझा मनोदय सिद्धीस जाईल असें ह्मणून निघून घरीं आला. नंतर एके दिवशीं कोतवालनें सावकारास विचारिलें, शेटजी, तुह्मी लग्न

कां करीत नाहीं सावकारानें उत्तर केलें, मला कुलीन मनुष्याची मुलगी पाहिजे, ती मिळाली तर बरी, नाहीं पेक्षां उगीच दुःख मात्र व्हावयाचें, याज करितां मी लग्न करीत नाहीं. कोतवाल ह्मणाला तुह्मां करितां मेहनत घेऊन मी मुलीची तजवीज करीन तो सावकार ह्मणाला तशी मिळाली तर फार चांगलें. नंतर कोतवालानें शहरांत चवकशी करून एक स्वरूपवती व कुलीन अशी उत्तम प्रकारची मुलगी पाहिली. आणि सावकारास सांगितलें, शेटजी, मुलगी तयार आहे. सावकारानें जाऊन पाहिली आणि उत्तम आहे असें ह्मटलें नंतर त्यानें लग्नाची तयारी करून तिशीं लग्न लाविलें आणि तिला आपले घरांत घेऊन आला. कांहीं दिवस गेल्यावर सावकारानें असा क्रम चालविला, कीं आपण बाहेर निघाला ह्मणजे बायकोचे पाठीवर एक जोरानें कोरडा मारावा. आणि बाहेर जावें त्या प्रमाणें क्रम चालविला असतां सावकारानें एके दिवशीं बाजारांत उत्तम प्रकारचें पक्कें कलिंगड खरेदी करून त्याचे दोन सारखे तुकडे केले. आणि चांगले धुपट दोन रुमाल पांढरे घेऊन, त्यादोन रुमालांत दोन तुकडे उपडे घातले त्यांतून तांबडें तांबडें पाणी गळूं लागलें, तेव्हां घाईनें धांवत धांवत घरांत आला आणि पेटारा उघडून आंत दोन्ही रुमाल ठेविले आणि कुलूप घालून रागावलेंसें करून दोन कोरडे आपले

वायकोचे पाठीवर मारून ह्मणाला, खबरदार, ही राजा
मुलांचीं शिरें कापून आणून पेटाऱ्यांत ठेविलीं आहेत. ज
तूं कोणास सांगतलें, तर तुझे दोन तुकडे करून टाकीन अ
ह्मणून धाई धाईनें बाहेर निघाला. तो दरवाजा बाहेर गेल
नाहीं इतक्यांतच ती बोंबा मारूं लागली. तों समोरच चा
डीहोती, तींतून कोतवाल शिपाई धांवतआले आणि कांरडते
स? असें तिला विचारिलें तेव्हां सांगितलें कीं, माझे नवऱ्यानें
राजाचे मुलांचीं शिरें कापून आणून पेटाऱ्यांत ठेविलीं
आहेत. आणि मी कोणास सांगेन ह्मणून मला मारून
बाहेर पडला. ही पहा माझी पाठ असें म्हणून आपली पाठ
कोतवालास दाखविली. कोतवालानें पाहिलें तों खरोखर
तिचे पाठीवर वळ उठले आहेत. मग काय विचारितां!
आधींच खुन तशांत राजाचा मुलांचा. मग काय! आधीच
उल्हास आणि त्यांत फाल्गूनमास! याह्मणी प्रमाणें
झालें, पोलीसचे लोक जिकडून तिकडून धांवले आणि कोठें
सावकार पळाला! आणि कोठें चोर पळाला! कोठें खुनी
पळाला! असे ओरडत जात आहेत. तों जवळच सावकार
भेटला. त्यास कांहीं न विचारितां धरा, मारा, द्या लाथा
बुक्या, बांधा मुसक्या, टाका करकठऊन चोरा पळत होतास,
आतां कोठें पळशील? असें ह्मणून पुष्कळ लाथा बुक्या मा-

रिल्या सावकारानें विचारिलें " मी केलें तरी काय ! मला मारिताकां!" कोतवालानें उत्तर केलें; यावेळेस तूं फार आपराधी आहेस, तुला येथें कांहीं सांगावयाचें नाहीं. लुच्या असें करतोस काय? असें ह्मणून चतुर्भुज करून बराबर बंदूक व तलवार शिपाई घेऊन मध्यें सावकारास घालून राजा पुढें आणिला आणि सांगितलें कीं, महाराज यानें मोठा आपला अपराध केला आहे. मेहरबानांचें मुलांचीं शिरें कापून यानें आपल्या पेटींत ठेविलीं आहेत. आणि बायको कोणास सांगेल ह्मणून तिला दोन कोरडे यानें मारिले आहेत. पाहिजे तर तिला आणून पहावें. आतां यास काय शिक्षा करावी ! राजानें कांहीं चौकशी न करितां, एकदम "सुळावर द्या," असा हुकूम केला. हुकूम होतांच मांग, शिपाई, कोतवाल त्यास घेऊन चालले त्या वेळीं सावकाराचा एक चाकर तेथें होता, त्यास त्यानें सांगितलें कीं, मी सुळावर जात आहे असें माझे बायकोस जाऊन सांग. त्याप्रमाणें तो मनुष्य रडत रडत तिजकडे गेला. आणि तिला सर्व हाकीगत सांगितली त्यावेळीं ती रागांत होती, यामुळें नवऱ्यानें जगावें असें तिला वाटलें नाहीं, आणि त्यास जाऊन सांगितलें. त्याप्रमाणें तो आल्यावर झालेली हकीगत त्यानें सावकारास सांगितली नंतर त्यास कळवंतिणी कडे जाण्यास सांगून, मी त्याच रस्त्यानें येतों

असें सांगून पाठविलें. आणि सावकारानें कळवंतीणीचे घरा-
कडे जाणाऱ्या रस्त्याकडे बोटकरून कोतवालास सांगितलें
महाराज, कृपा करून मला त्या रस्त्यानें घेऊन चला. कोतवा-
लानें तें ह्मणणें कबूल करून त्या रस्त्यानें घेऊन गेला.
जेव्हां ते सर्व लोक कळवंतिणीचे घराजवळ आले. तेव्हां त्यानें
कांहीं एक प्रकरणाच्या खुणाचा शब्द तेथें केला तो वाड्यांत
कळवंतिणीनें ऐकून आपल्या मजल्या वरून खालीं पाहिलें,
तों सावकारास घेऊन जात आहेत असें दिसलें. आणि
मोठी दुःखी होऊन खालीं येऊन कोतवालास दोनशें रुपये
दिलें आणि सांगितलें कीं, दोन घटका पर्यंत यास सुळावर
न देतां त्या वडा खालीं बसावें ( बोटानें दाखविते ) तेथ-
पर्यंत मी बादशहाकडे जाऊन त्यास सोडविण्या विषयीं
विचारितें जर त्यानें सोडविण्या विषयीं सांगितलें तर यास
सोडा, नाहीं तर घेऊन जा. असें ऐकून कोतवालानें विचार
केला कीं, आपणास दोनशें रुपये मिळतात आणि दोन
घटिका पर्यंत सुळावर देऊनको, ह्मणून ही सांगते. तर, असें
केलें असतां, त्यांत आपला काय तोटा होणार आहे? कांहीं
नाहीं. असें ह्मणून कबूल होऊन दोनशें रुपये घेतले, आणि
दोन घटिका पर्यंत तहकूब ठेवितों. असें सांगितलें, आणि
वडाखालीं नेऊन बसविला. ईकडे कळवंतीण उत्तम प्रकारचा

पोषाख करून बादशहाचे कचेरींत गेली. आणि तिनें असें सुस्वरगायन केलें कीं, तेणेंकरून बादशाहा अगदीं मोहीत होऊन गेला आणि ह्मणाला " माग काय पाहिजे तें " कळवंतीणीनें उत्तर केलें, महाराज अभिवचन पाहिजे. बादशाहा ह्मणाला, त्यास देतों माग. कलवंतीण ह्मणाली, महाराज, आतां सावकारास सुळावर देण्याकरितां नेला आहे, त्यास सोडिला पाहिजे. बादशहा ह्मणाला, त्यास सुळावर दिला असेल आतां तो जिवंत नाहीं. कलवंतीणीनें उत्तर केलें, जर जिवंत असेल तर सोडावा मेला असेल तर माझें बोलणें नाहीं बादशाहा ह्मणाला, जिवंत असला तर सोडून द्या. असें ऐकतांच शिपायी धांवले आणि कोतवालास सांगितलें कीं; " बादशाहानें सावकारास सोडून देण्याविषयीं सांगितलें आहे " त्या प्रमाणें कोतवालानें त्यास सोडून दिला. तों कळवंतीण तेथें गेली. आणि सावकारास आपले वाड्यांत नेला आणि दुःखानें रडूं लागली तेव्हां सावकारानें तिचें शांतवन केलें आणि सांगितलें कीं, तूं भिऊं नको, मी कांहीं कामाकरितां तें मुद्दाम करून घेतलें. आतां आपले नगरास जातों आणि चार दिवसांनीं येऊन तुला घेऊन जाईन. असें ह्मणून आपला व्यापार आटोपला आणि आपले नगरास निघून गेला. नग-

रांत येतांच राजास जाऊन भेटला आणि सांगितलें कीं "सर्व जिन्नसा तयार आहेत" असें ऐकतांच राजास मोठा आनंद झाला. आणि जिन्नसा कोठें आहेत? " असें विचारिलें." तिकडेच आहेत असें प्रधानानें सांगितलें आणि राजाचे नावाचें पत्र बादशहास लिहून सही करण्याकरितां राजाजवळ दिलें. राजानें सही करून प्रधानाजवळ दिलें आणि त्यास बादशहाकडे जाण्याचा हुकूम दिला.

नंतर प्रधानानें आपली प्रधानकीचीं वस्त्रें व पुष्कळ सैन्य बरोबर घेतलें. घोडे, उंट, हत्ती, वगैरे घेतले आणि वाजत गाजत बादशहाकडे येऊन भालदारास वर्दी लावण्याविषयीं सांगितलें. भालदारानें बादशहास सांगितलें कीं, " उदेपुरचा राजा रोहसेन, याजकडून प्रधान आला आहे हुकूम होईल तर आंत बोलावीन. बादशहानें सांगितलें कीं, "येऊं द्या" नंतर प्रधान आंत येतांच बादशहानें उठून ताजीम दिली. प्रधानानें बसल्यावर राजाकडून आणलेलें पत्र दिलें तें बादशहानें वांचिलें त्यांतील तात्पर्य आपल्या पत्राप्रमाणें हल्लीं प्रधाना बरोबर चार जिन्नसा पाठविल्या आहेत त्या घेऊन मेहरबानीनें पोंहचल्याचें उत्तर पाठविण्यास आळस होऊं नये. असें पत्र वांचताच "जिनसा कोठें आहेत" असें प्रधानास विचारिलें " जवळच आहेत " असें प्रधाना

उत्तर केलें आणि आपली बायको व कळवंतीण ह्या ह्याच शहरांत होत्या त्यास सभेंत आणल्या, कोतवाल जवळच होता नंतर प्रधानानें आपली बायको पुढें उभी केली आणि सांगितलें कीं, मी पूर्वीं येथें सावकार होऊन आलों आणि व्यापार चालविला तेव्हां हिच्याशीं लग्न लाविलें. मग असा क्रम चालविला कीं, मी बाहेर निघालों ह्मणजे हीला एक कोरडा मारावा आणि बाहेर जावें असें होत असतां, मी एके दिवशीं एक पक्के कलींगड खरेदी केलें आणि त्याचे दोन तुकडे करून दोन रुमालांत दोन घालून पेटारांत ठेविले आणि हिला सांगितलें कीं, बादशहाचे मुलांची शिरें कापून ठेविलीं आहेत हें जर तूं कोणास सांगशील तर तुझे दोन तुकडे करीन, असें सांगून दोन कोरडे हिचे पाठीवर मारिले आणि मी बाहेर गेलों, इतक्यांत हीनें बोंबा मारून कोतवालाकडून मला धरून आपल्याकडे आणिलें तेव्हां आपण मला सुळावर देण्याचा हुकूम केला त्याप्रमाणें मला कोतवाल नेत असतां. कळवंतीणीनें मला वांचविलें. ही माझी कुलीन लग्नाची बायको हिनें माझा प्राण जात असला तर वांचवावयाचा प्रयत्न करावा. परंतु तसें न करितां मला मारण्याच्या उद्योगास लागली याजकरितां ही अस्सल असून कम अस्सल ही एक वस्तु. नंतर कळवंतीण पुढें उभी केली आणि सांगितलें की

कळवंतीण कम अस्सल जातीची होय? मी हिला वाळगिली, तथापि मी मेलों तर हिला दुसरा कोणी तरी पहावयाचा मार्ग होता, परंतु तसें न करितां मी मरणार असें पाहून हिनें आपणाकडे येऊन मला सोडविलें तेव्हां हिनें कम अस्सल असून अस्सल काम केलें सबब ही "कम अस्सलका अस्सल" ही दुसरी वस्तु नंतर कोतवालाकडे बोट करून ह्मणतो हा वजारका कुत्ता कसातर, कुत्र्याचा स्वभाव असा असतो कीं, जो पर्यंत त्यास भाकर मिळते तों पर्यंत मागें पुढें नाचतो, परंतु जर एक दिवस भाकर मिळाली नाहीं तर जीव घेण्यास तयार होतो त्याप्रमाणें तूं आहेस. अरे ज्या वेळेस माझे सायकोनें वादशहाचे मुलगे मारल्याविषयीं तुह्मास सांगितलें त्या वेळेस तूं मला मारहाण केलीस परंतु एका शब्दानें तरी विचारिलेंस काय? कीं सावकार कसें काय आहे हें असो मी विचारिलें त्या वेळेस तरी सांगावयाचें होतें. परंतु ज्या वेळेस मजकडून तुला चैन भोगण्यास मिळत होती, तेव्हां कुत्र्या प्रमाणें नाचत होतास याजकरितां वजारका कुत्ता. तूं आहेस असें कोतवालास बोलून वादशाहास "ही तिसरी वस्तु" असें सांगितलें, नंतर वादशहा ह्मणाला गादीका गद्दा कोठें आहे? प्रधान ह्मणाला "आपणच" वादशहा ह्मणाला "कसा" प्रधान म्हणाला ज्या वेळेस कोतवालानें मला

कैद करून आपणा पुढें आणिलें आणि सांगितलें कीं "यानें आपल्या पुत्रांचीं शिरें क..्न आपल्या पेटाऱ्यांत ठेविलीं" त्या वेळेस आपण कांहीं तरी विचार केला काय? कीं आपले पुत्र जिवंत आहेत कीं नाहींत! तसा विचार न करितां एक दम "सुळावर द्या" असा हुकूम केला. मी आपले पेटाऱ्यांत कलींगडाचे तुकडे ठेविले होते ते पहावेत. आतां गादीका गद्धा कोण? हें आपण विचार करून पहावें मला वाटतें आपणच ही चवथी वस्तु.

आतां चारही वस्तु ( जिनसा ) पोंचल्याविषयीं मेहरबानीनें उत्तर द्यावें, असें प्रधानानें बादशहास सांगितलें बादशहानें प्रधानावर सुप्रसन्न होऊन; त्याची वहावाकरून उत्तम प्रकारचीं वस्त्रें, दिलीं आणि राजास लिहिलें कीं आपण पत्राप्रमाणें प्रधानाबरोबर जिनसा पाठविल्या त्या पोंहचल्या आतां आपण निर्भय रहावें असें पत्र देऊन जाण्यास सांगितलें. नंतर प्रधान कलवंतीण व आपली बायको बरोबर घेऊन नगराकडे परत आला आणि राजास भेटला; तेव्हां राजास मोठा आनंद झाला त्याची वहावा करून त्यास पुष्कळ द्रव्य बक्षीस दिलें व त्यावर फार प्रीति करूं लागला.

# गोष्ट ५ वी.

## न्याय करण्याचें अलौकिक चातुर्य.

## ( एक मनोरंजक गोष्ट. )

प्राचीनकाळीं चित्रपूर शहरामध्यें शांतवर्मा नांवाचा एक प्रामाणीक व निःपक्षपाती न्यायाधीश रहात होता. तो आपल्या न्याय करण्याच्या अलौकिक चातुर्यामुळें भरतखंडांत सर्वत्र प्रख्यात असे. एके दिवशीं मणीपूर शहरचा चंद्रकांत राजा ह्याचे कानावर त्याची कीर्ति गेली; तेव्हां त्यानें आपले मनांत विचार केला कीं, त्या न्यायाधिशाचें चातुर्य आपण स्वतः जाऊन पहावें असा विचार करून एक साधा पोषाख घालून तो एकटाच एका घोड्यावर बसून निघाला तो चित्रपूर शहरांत जाणाऱ्या मार्गाजवळ येऊन पोंहचला; इतक्यांत रस्त्याचे एके बाजूस एक लंगडा भिकारी बसला होता. तो ( हा राजा आहे असें न समजून ) त्यास प्रार्थना करून ह्मणाला, महाराज मला या शहरांतील बाजारा जवळ जावयाचें आहे; परंतु माझ्यानें चालवत नाहीं, याकरितां मला तेथपर्यंत न्याल तर मजवर आपले फार उपकार होतील तेव्हां रा-

ास दया येऊन त्यास आपले घोड्यावर घेऊन बाजारा जवळ आल्यावर तो लंगड्यास ह्मणाला. ‘ आतां तूं खालीं उतर, लंगडा ह्मणाला उतर कोणाला ह्मणतोस ? माझ्या घोड्यावरून मला खालीं उतरावयास सांगणार तूं कोण ? याप्रमाणें दोघांची तक्रार चालली आहे, इतक्यांत सरकारचे शिपायी येऊन त्यानीं त्या दोघांस घोडयासह न्यायाधिशाकडे नेलें. त्या चमत्कारीक तंट्याचा न्याय पाहण्याकरितां त्यांच्या मागून त्या शहरचे हजारों लोकही आले. कचेरींत न्यायाधिशाची स्वारी येऊन बसल्यावर पहिला कज्या पुढें बोलाविला ( हा तंटा येण्या पूर्वी तेथें दुसरे दोन तंटे आले होते ) तेव्हां एक तेली व एक खाटीक असे दोघे पुढें झाले. तेव्हां न्यायाधिशानें विचारिलें कीं यांत वादी कोण आहे ? तेली पुढें होऊन ह्मणाला, ‘ मी वादी आहे ’ खाटीक ह्मणाला ‘ मी वादी ’ याप्रमाणें तेली ह्मणे ‘ मी वादी ’ खाटीक ह्मणे ‘ मी वादी ’ न्यायाधीश ह्मणाले, असा गोंधळ करूं नका, तुह्मी आपली खरी हाकीकत मला सांगा ह्मणजे झालें. नंतर तेली प्रथम ह्मणाला, महाराज मी दुकानावर हिशेब लिहीत असतां हा खाटीक मजकडे येऊन तेल मागूं लागला, तेव्हां मी यास तेल देऊन आपला हिशेब लिहीत बसलों; इतक्यांत जवळ पैशाची पिशवी होती तिजकडे दृष्टी

गेली, तों ती तेथें नाहीं असें पहातांच खाटीक येण्यापूर्वी ती तेथें होती आणि तो तेल घेऊन गेल्यावर दुसरें कोणी आलें नाहीं, त्यावरून ह्याचाच संशय येऊन मी लागलाच मागो माग जाऊन पहातों तों ह्याचे हातांत पिशवी आहे. तेव्हां मी ही पिशवी ह्याच्या हातांतून हिसकाऊन घेतली, तेव्हां हा ह्मणाला 'ही पिशवी माझी आहे' ह्मणून आह्मी येथें आलों आहों, तर आमचा न्याय करून माझी पिशवी मला देऊन ह्याला योग्य वाटेल ती शिक्षा करावी. हें जें खरें होतें तें मी सांगितलें व यांत कांहीं खोटें बोललों असेन तर मला ईश्वराची शपथ आहे.

नंतर खाटकी पुढें होऊन ह्मणाला, महाराज मी माझ्या दुकानांत बसून विक्रीचा पैसा मोजीत होतों, इतक्यांत हा तेली तेल देण्यास आला, हा मजकडे तेल देण्याकरितां नेहमी येत असतो, आणि ह्याचे दुकानही माझे घरापासून ४।५ घरांचे अंतरावर आहे. नित्याप्रमाणें हा तेल देऊन गेला. इतक्यांत जवळच एक पैशाची पिशवी मी ठेविली होती ती मी पहातों तों नाहीं. त्यावरून मला ह्याचा संशय आल्यामुळें मी लागलाच ह्याच्या मागें धांवत जाऊन गांठलें तों त्याच्या हातांत ही पिशवी होती. ती मी मागूं लागलों तेव्हां हा हुजत करून 'ही पिशवी माझी आहे' असें ह्मणूं लागला,

ह्मणून मी यास येथें घेऊन आलों आहें. ह्या प्रमाणें खरी कागित आहे यांत कांहीं खोटें बोललों असेल तर मला पैगंबराची शफत आहे.

हें ऐकून न्यायाधिशानीं ती पिशवी आपणाजवळ ठेविली आणि उद्यां तुमचा न्याय करीन असें सांगून त्यांस जाण्याचा हुकूम दिला. नंतर दुसऱ्या फिर्यादीस पुढें बोलाविलें तेव्हां एक स्त्री पुढें होऊन खालीं लिहिल्याप्रमाणें बोलूं लागली.

महाराज मी आपल्या ह्या चित्रपूर शहरा नजीकच्या शहा गावीं रहातें सुमारें एक महिन्या मागें एके दिवशीं एकाएकीं मला परदेशीं जाणें भाग पडल्यामुळें तशा प्रसंगीं असें सामान व ऐवज ठेवण्याजोगा विश्वासू कोणी नसल्यामुळें माझ्या पांचसे ५०० मोहरा होत्या त्या कोणाजवळ ठेवाव्या अशी काळजी पडली शेवटीं त्या गांवच्या काजीकडे ठेवाव्या असा विचार केला कारण काजी हे न्याय रक्षक निःपक्षपाती असतील ह्या उद्देशानें त्या मोहरा एके पेटींत घालून ती बंद करून काजी साहेबाकडे नेऊन दिली आणि सांगितलें कीं, मला कांहीं अगत्याच्या कारणामुळें बाहेर गांवीं जाणें आहे व हा माझा ऐवज ठेवण्यास आपणा सारखा दुसरा कोणी विश्वासू मनुष्य दिसत नाहीं, याकरितां हा ऐवज नीट संभाळून ठेवा परत आल्यावर घेऊन जाईन, आपल्या मेहनती

बद्दल आपणास शक्तीप्रमाणें देईन. त्यावर काजी ह्मणः ऐ
कीं बाई ऐवज ठेऊन खुशाल जावें ह्यांतील एका कवडीस
ही धक्का बसणार नाहीं. पुढें मी गांवाहून परत येतांच काजी-
कडे गेलें आणि माझी पेटी मागूं लागलें. तेव्हां काजी म्हणा-
ले, बाई तुला वेड तर लागलें नाहीं. तूं मजजवळ पेटी
दिली केव्हां? खोटें बोलणाराचें घरदार लुटावें असा ह्या
शहरचा कायदा तुला ठाऊक नाहीं वाटतें. जा आल्या वाटेनें
चालती हो, नाहीं तर धक्के मारून चालती करीन, ह्याप्रमाणें
नाकबूल गेले ह्मणून मी आपणाकडे आलें आहे तर कृपाकरून
माझा ऐवज मला द्यावा.

हें ऐकून न्यायाधीश कांहीं वेळ स्तब्ध राहून ह्मणाले बाई
उद्यां सकाळीं सहा वाजतां काजीकडे जाऊन पुनः एकवेळ
त्याजवळ ऐवज माग नंतर उद्यां ह्या वेळेस येऊन जें होईल तें
मला कळवा असें सांगून तिला जाण्यास हुकूम दिला.

नंतर तिसरा तंटा पुढें आणण्यास हुकूम केला तेव्हां चंद्र-
कांत पुढें होऊन ह्मणाला—आज मी मणीपुराहून या शहरास
यावयास निघालों तेव्हां रस्त्यामध्यें या लंगड्यानें या शह-
रांत आणण्याविषयीं दीनमुद्रेनें प्रार्थना केल्यावरून मला
त्याची दया येऊन त्यास घोड्यावर बसऊन शहरांत आ-
णिलें, व यास खालीं उतरण्यास सांगितलें, तेव्हां हा ह्मणाला

उतरावयास कोणास सांगतोस, हा घोडा कां तुझा आहे; या प्रमाणें तक्रार होत होती त्यावरून शिपायानें आह्मास येथें आणिलें तर याचा योग्य न्याय करून माझा घोडा मला द्यावा. त्यांत मी कांहीं खोटें बोललों असेल तर परमेश्वराची शपथ आहे.

नंतर लंगड्यास विचारिल्यावरून त्यानें सांगितलें कीं, महाराज मी आपल्या घोड्यावरून ह्या शहरास येत असतां वाटेंत या मनुष्याची दीनप्रार्थना ऐकून व हा फार थकलेला आहे असें पाहून यास घोड्यावर घेऊन शहरांत आणिलें, तेव्हां हा खालीं न उतरतां माझा घोडा जुलमानें घेण्यांकरितां भांडत होता इतक्यांत शिपायानीं आह्मास येथें आणिलें, ह्मणून आपण न्याय करून माझा घोडा मला देऊन यास शिक्षा करावी. यांत मी कांहीं खोटें बोललों असेन तर सर्व साक्षी जो भगवान तो मला शिक्षा करो. हें ऐकून घेतल्यावर त्या प्रामाणीक न्यायाधिशानें त्यास सांगितलें कीं सध्यां हा घोडा मजकडे ठेऊन जा आणि उद्यां या ह्मणजे तुमचे कज्याचा निकाल करीन.

दुसऱ्या दिवशीं आज कांहीं चमत्कारीक कज्याचा न्याय होणार आहे. अशी शहरांत वातमी पसरल्यामुळें दुसरे दिवशीं कचेरी मनुष्यानें भरून गेली. कांहीं वेळानें न्यायाधि-

शाची स्वारी येऊन आपल्या स्थानावर बसतांच सर्व न्यायाधिशाकडे ध्यानस्था सारखे पहात राहिले. नंतर न्यायाधिशानें पुन्हां त्यांच्या जबान्या घेतल्यावर पहिला तंटा पुं आणण्यास सांगितला त्यावरून खाटीक व तेली पुढें आले तेव्हां न्यायाधिशानें दोघांच्या जातींचीं दोन पवित्र पुस्तकें पुढें ठेऊन ज्याची पिशवी असेल त्यानें हें धर्म पुस्तक हातां घेऊन, ही पिशवी माझी आहे, अशी शफत घेण्यास सांगितलें. तेव्हां दोघांनींही आपआपलीं धर्म पुस्तकें हातांत घेऊन शपत घेतली. नंतर न्यायधिशानें ती पिशवी खाटकास देऊन तेल्यास पन्नास फटके मारण्याचा हुकूम केला.

नंतर त्या किर्यादी बाईस पुढें बोलाऊन तिला विचारिलें कीं, बाई तुमचा ऐवज तुह्माला मिळाला किंवा नाहीं तेव्हां ती ह्मणाली माझा सर्व ऐवज मला मिळाला. हें ऐकून तिला एके बाजूस उभें रहावयास सांगितलें.

आतां राहिलेला कज्जा पुढें आणण्याचा हुकूम केला. तेव्हां चंद्रकांत व लंगडा भिकारी हे दोघे पुढें झाले तेव्हां न्यायाधिशानें त्या जवळ धर्म पुस्तक देऊन त्यांजवळून शपत घेतल्यावर त्याचा घोडा न्यायाधिशानें आपले घोडेशाळेंत नेऊन ठेविला होता तींत पुष्कळ घोडे होते तेथें प्रथम लंगड्यास नेऊन सांगितलें कीं, ह्या घोड्यांतून तुझा घोडा तूं ओळखून

काढ. लंगड्यानें तो घोडा पूर्णपणे ओळखून ठेविला होता ह्मणून त्यानें तो तात्काळ ओळखून काढिला नंतर चंद्रकांतास नेऊन सांगितलें कीं तुझा घोडा तूं ओळखून काढ तेव्हां चंद्रकांतानें आपला घोडा तेव्हांच ओळखून काढिला. नंतर कचेरींत येऊन तो घोडा चंद्रकांतास देऊन लंगड्यास पन्नास फटके मारण्याचा हुकूम केला.

इतका न्याय होत आहे इतक्यांत ज्या काजीनें त्या बाईची पेटी ठेविली होती. व ती देत नव्हता तो कचेरींत आला तेथें त्या बाईस पाहून अगदीं खिन्न झाला त्यास पाहून न्यायाधीश ह्मणाले यावें महाराज तुह्मीं न्यायाधिशाचें काम करण्यास योग्य आहांत या बाईसारख्या मनुष्यानें आपण विश्वासू समजून कांहीं ठेव तुह्माकडे ठेविली आणि ती परत मागितली ह्मणजे तें खोटें करून आपण खरे काजी त्याची घरें दारेंही लुटणारना ! या वरून तो काजी अगदीं निरुत्तर झाला तेव्हां न्यायाधिशानें सांगितलें कीं आज पासून तुह्मास कामावरून काढून टाकिलें आहे हीच शिक्षा तुह्मास पुरे आहे असें सांगून त्यास व त्या बाईस जाण्याचा हुकूम केला.

नंतर कचेरींतील सर्व लोक गेल्यावर चंद्रकांत न्यायाधिशाजवळ जाऊन ह्मणाला, मी आग्रा शहरचा राजा चंद्रकांत आहे आपली न्याय कीर्ति श्रवण करून आपणास भेटावयास

येत होतों; इतक्यांत रस्त्यांत मी जबानींत सांगितल्या प्रमा णें गोष्ट घडून आली आतां कृपा करून आपण हे न्याय को णत्या आधारानें केले हें सांगावें, न्यायाधीश ह्मणाला, मी घरीं गेल्यावर ती पैशाची पिशवी सोडून ते पैशे पाण्यांत धुव विले तेव्हां किंचित तांबूस रंगाचें वर खराब वासाचें तें पाणी झालें यावरून मी तर्क केला कीं हे पैशे जर तेल्याचे असते तर कांहीं तेलकटसे दिसले असते तसें नाहीं. तर यावरून ते खाटकाचे असावे त्याच्या हाताचें वगैरे रक्त लागल्यामुळें पाणी लाल झालें आहे असा निश्चय करून त्याप्रमाणें न्याय केला. नंतर रात्री त्या काजीकडे जाऊन त्याला सांगितलें कीं मला कांहीं दिवस बाहेर गांवीं जाणें भाग आहे करितां तुह्मास माझे जागेवर नेमणें आहे. व माझा खजीनाही आ पले जवळ ठेवणें आहे असे सांगून मी घरीं आलों पुढें त्या बाईनें जाऊन पैसे मागितले, तेव्हां ती कदाचित् फिर्याद जा ईल, तर आपली बेआब्रु होईल. व आपणास न्यायाधिशा ची जागा मिळणार नाहीं, ह्या भीतीनें ते पैशे दिले. पुढें या कचेरींत लंगड्यानें हा घोडा ओळखला व आप णही ओळखला असें असून त्यास शिक्षा केली, याचें कारण माझा हेतू तुम्ही घोडा ओळखून काढावा असा नव्हता; तर तो घोडा तुह्मा दोघांतून कोणास ओळखतो, हें पहावयाचें

होतें, लंगडा जेव्हां त्या घोडयाजवळ गेला तेव्हां घोडा मा-
गें हाटून चमकला व तुम्हीं गेलां तेव्हां मोठ्या आनंदानें
पुढें आला तेव्हां मी समजलों कीं; हा घोडा आपलाच आहे
ह्या तिनीही न्यायांत जर कांहीं चूक झाली असती तर ते आ-
णखी कांहीं बोलल्या शिवाय राहिले नसते परंतु तसें न हो-
ता ते मुकाट्यानें चालते झाले.

हें ऐकून राज्यानें न्यायाधिशाची पुष्कळ वाखाणनी करून
त्यास बक्षीस रुपये ५०० देऊन आपले शहरीं येता झाला.

## गोष्ट ६ वी.

### बिरबलाचें चातुर्य.

बादशहा व बिरबल ह्यांच्या अनेक गोष्टी हिंदु व मुसल-
मान ह्यांच्या तोंडांतून वारंवार निघत असत, हा बादशहा
कोण होता ह्याचा बरोबर निर्णय करणें कठीण आहे. कि-
तीएक लोक ह्या गोष्टी अकबर बादशहाच्या असें ह्मणतात,
परंतु कांहीं कांहीं गोष्टीमध्यें बादशहाचा इतका अप्रयोजक-
पणा दर्शविला आहे कीं, तो ऐकल्यावर त्या गोष्टी अक-

बरासारख्या शहाण्या व नीतिमान पुरुषाच्या असतील, असें ह्मणवत नाहीं. बिरबल हा वजीराचे कामावर असून जातीचा ब्राह्मण होता. व ब्राह्मणी राज्य भ्रष्ट होऊन त्याचीं जीं पांच वेगळालीं राज्यें झालीं. त्यांतील अहमद नगरचे बादशहानें वजीरांचीं कामें ब्राह्मणासही दिलीं होतीं असी इतिहासांत कथा आहे, यावरून वरील गोष्टी ह्या बादशहाच्या वेळच्या असाव्या असें अनुमान होतें, वाचकहो या विषयींचा निर्णय तुह्मावरच ठेऊन माझ्या ऐकण्यांत वरील नांवा खालीं मोडणाऱ्या ज्या गोष्टी आल्या आहेत त्या पैकीं कांहींचा मी ह्या पुस्तकांत संग्रह केला आहे.

बिरबल हा मोठा बुद्धिमान असल्यामुळें बादशहाची त्याजवर फार मर्जी असे; व कोणतेही राज्यप्रकरणीं फेरफार करणें झाल्यास तो त्याच्या मसलतीं वांचून करीत नसे. हें बाकीच्या मुत्सदी लोकांस न आवडून बिरबल त्यांच्या डोळ्यांत रात्रंदिवस खुपूं लागला. त्यांनीं विचार केला कीं, हा परजातीचा मनुष्य आपल्या राज्यांत उत्कर्ष पावला असतां, मागें पुढें आपल्या जातीस फार जड जाईल. त्यास कांहीं युक्ती काढून ह्याचा नाश होण्याची तजवीज योजावी. बादशहाजवळ सलगीचें भाषण बिरबला शिवाय दुसरा कोणी फारसें करीत नसे. एक इमाम नांवाचा ह्मातारा

न्हावी त्याची हजामत करीत असे, तो मात्र केव्हां केव्हां विनोदाचीं भाषणें करून त्याजवळ मोकळेपणीं बोलत असे ह्मणून मुत्सदी लोकांनीं बिरबलाविषयीं बादशहाचे मनावर कांहीं तरी भलताग्रह उत्पन्न करून त्याचा नाश करण्याचें काम त्यास सांगितलें व त्याबाबद त्यास मोठें बक्षीस देऊं केलें. नंतर एके दिवशीं हजामत करीत असतां, तो बादशहास ह्मणाला, महाराज आपल्या हजामती वरून मला आपल्या वडिलांची आठवण झाली त्यांची प्रकृति किती नाजूक! त्यांसही तुमचा सारखाच वस्तरा जराही सोसत नसे, महाराज त्यांचे जवळ मी एकंदर अठ्ठावीस वर्षं काम केलें. पण एक दिवस ही त्यांचा घुस्सा करून घेतला नाहीं. ते स्वर्गवासी झाल्यास आज दहा वर्षं झालीं, पण त्यांजकडील समाचार मुळीच समजत नाहीं. व आपणही त्यांकडील कांहींच खबर आणवीत नाहीं, हें कसे!" बादशहा ह्मणाला, वेड्या, स्वर्गलोकीं जीं मनुष्यें जातात त्यांचा समाचार भूलोकीं कसा कळेल? तेथें कांहीं जासूद पाठवितां येत आहेत! "न्हावी ह्मणाला," छी, महाराज स्वर्गलोकींचा समाचार आणणें हें काम का या हालक्या सलक्या जासूदांच्या हातून होण्याजोगे आहे? तें काम एक बिरबलच करो जाणें, तो मोठाचतुर आहे. मागें एकदां आपल्या वडीलांच्या वेळीं त्यानें स्वर्ग-

लोकांहून आपल्या घराण्यांतील सर्व मंडळीचा समाचार आणिला होता. त्यावेळीं खर्च मोठा आधिक आला होता खरा, आपल्या वडीलानें बिरबलास सुगंध तेलानें स्नान घालून व ब्राह्मणांचे स्मशानामध्यें चिता रचऊन मोठ्या समारंभानें त्यास आंत निजविलें आणि आग लावून दिली. मग तो धुरा बरोबर आकाशांत चढला. काय त्याची पुण्यायी सांगूं तें काम त्यासच योग्य महाराज आपण एकवार खर्चास भिवूंनका; आणि त्यास वर पाठऊन वडिलांची खबर आणवा.

हें न्हाव्याचें बोलणें बादशहास खरें वाटलें, मग त्यानें बिरबलास बोलावून आणून, त्यास ती गोष्ट विचारली. त्यानें मनांत आश्चर्य करून बादशहास ह्मटलें, महाराज, मीं एकदां स्वर्ग लोकास गेलों होतों. ही गोष्ट खरी आहे. पण ती फार गुप्तपणी केली असून त्यावेळच्या पांच चार जणास मात्र ठाऊक होती. ती बाहेर न फोडण्याविषयीं आपल्या वडीलानें मोठी जरब देऊन सांगितलें होतें. त्याच्या आज्ञेवर पुज्यबुद्धी ठेऊन त्यांच्या मागेंही ती गोष्ट आपणाजवळ आजपर्यंत मी सांगितली नाहीं. असें असतां आपल्या कानावर ही गोष्ट कशी आली. ? मग बादशहानें झालेली सर्व हाकीकत त्यास सांगून ह्मटले तूं पुनः एकवार जर वडिलांचा समाचार घेऊन येसील तर फार चांगले होईल "

बिरबलानें उत्तर केलें "महाराज स्वर्गलोकीं जाणे ही गोष्ट मनुष्यास सर्वस्वी दुर्लभ आहे परंतु मंत्र सामर्थ्यानें पाहिजे ती गोष्ट करितां येते ह्या कार्याच्या सिद्धी करितां कितीएक दिवस अनुष्ठानें व होम हवनें केली पाहिजेत. व त्यास द्रव्यही पुष्कळ पाहिजे ह्याकरितां ह्या गोष्टीस माझ्यानें रुकार देववत नाहीं. पण इतकेंहीं असून आपली खर्च करण्याची इच्छा असेल तर आपली आज्ञा मला सर्वस्वी वंद्य आहे. चार लक्ष रुपये माझ्या स्वाधीन करा, ह्मणजे आज पासून सहा महिन्याचे आंत वडिलांचा समाचार घेऊन येतो."

बादशहानें ती गोष्ट मान्य केली. मग बिरबलानें पुष्कळ खर्च करून स्मशानांतून आर्धकोस पर्यंत गुप्तपणें एक भुयार तयार करविलें आणि एके दिवशीं रात्रीं मोठ्या समारंभानें न्हान्यानें सांगितल्या प्रमाणें चिता तयार करऊन. बादशहा, तो न्हावी, व दुसरे कितीएक लोक ह्यांच्या समक्ष तो चितेंत जाऊन निजला. व बादशहानें ती पेटवितांच आपण पूर्वी केलेल्या गुप्त वाटेनें बाहेर पडून गेला. बिरबल आतां आपले वडीलाचा समाचार आणील, व स्वर्गलोकींच्या दुसऱ्याही पुष्कळ खबरा सांगेल ह्मणून बादशहास मोठा आनंद झाला, व आपले हृदयांतील रात्रं दिवस सलणारा कांटा निघाला. ह्मणून मुत्सदी लोकांस ही मोठ समाधान

वाटलें. त्यांनीं न्हाव्याच्या युक्तीची मोठी तारीफ करून, त्यास पुष्कळ इनाम दिलें. इकडे बिरबल त्या नगरांतच एका घरांत गुप्तपणीं राहिला होता त्यानें बादशहास स्वर्गलोकीं काय काय वर्तमान सांगावयाचें त्याची योजना यथास्थीत करून ठेविलीच होती मग सुमारें सहामहिनें लोटल्यावर एके दिवशीं विजेचा मोठा गडगडाच चालला आहेच; पाऊसही पुष्कळ पडत आहे असी संधी पाहून तो नगरांत प्रगट झाला. त्यानें आपल्या आंगास ठायीं ठायीं मुद्रा ठोकून व चित्र विचित्र रंगाची वस्त्रें पांघरून विलक्षण रूपधारण केलें होतें; व त्यांतच सहामहीनें पावेतों हज्यामत झाली नसल्यामुळें त्याची चर्या इतकी निराळी दिसत होती कीं, प्रथम त्यास लोकांनीं ओळखलें नाहीं. बिरबल स्वर्गलोकाहून आला ही बातमी बादशहास कळतांच त्यानें त्यास मोठ्या समारंभानें दरबारीं नेलें. आणि स्वर्गलोकांची इत्यंभुत हकीगत विचारिली बिरबल ह्मणाला “ आपण चिता पेटवितांच जो धूर उत्पन्न होऊन आकाशांत गेला. त्याबरोबरच मंत्र सामर्थें करून मीं वर चढलों तो थेट मेघमंडळा पावेतों गेलों. तेथें जातांच मला पुष्कळ विमानें दिसूं लागलीं. त्यांपैकीं मीं एकांत जाऊन बसलों; आणि मला स्वर्गलोकाकडे जावयाचें आहे अशी आपली इच्छा त्यास दर्शवितांच ते मला

तिकडे घेऊन गेले तेथील चमत्कार काय सांगावा ? महाराज, आजपावेतों पुष्कळ तपश्चर्या करून किंवा यज्ञयागादिक कर्मे आचरून मोठमोठ्या राजकुळांतील पुरुषही स्वर्गलोकांची इच्छा करीत आले ती उगाच नव्हे. तेथील रहीवासीजीं सुखें आनुभवीत आहेत; तीं सांगतां येत नाहींत. त्याचें वास्तवीक स्वरूप स्वताचे आनुभवावांचून कळावयाजोगें नाहीं. काय त्या अमृताची गोडी. रंभांचें नृत्यगायन तर किती मनोहर ! महाराज, खरोखर पुसालतर माझ्यामनांत परत इकडे यावयाचें नव्हतें व तेथल्या सुखास भुलून मी आपल्या आज्ञेचा अनादर केला असता, पण काय करूं ? आपल्या वडिलांचा मोठा आग्रह पडला, त्यांत तेथें इतकी सुखें आहेत तरी एका गोष्टीची मोठी अनूपत आहे, ती कोणती ह्मणाल तर, स्वर्गलोकांतील रहीवास्यांस ह्या जगांतील लोकांप्रमाणें उदरनिर्वाहाकरितां मुळींच श्रम करावे लागत नाहींत लागेल तेवढें आमृत प्यावयास मिळतें; व ते पिऊन असें समाधान होतें कीं इहलोकींचीं सर्व पक्वानें त्यापुढें रद्द आहेत. ह्या प्रमाणें पोटाची सोय असल्यामुळें कोणी कोणाची परवा ठेवीत नाहीं. ह्यामुळें आपले वडिलास हजामतीची मोठी पंचायीत पडते. आपल्या ईमाम न्हाव्याचा बाप तेथें आहे तो मोठ्या खिनतवारीनें केव्हां केव्हां त्यांच्या उपयोगीं पडतो.

पण त्याचा हात फार जड आहे व आपल्या वडिलांची प्रकृति फार नाजूक असल्यामुळें त्यांस वस्तरा अगदीं सोसत नाहीं ह्मणून ते अलीकडे हजामत करीत नाहींत. महाराज आपल्या वडिलांसारख्यांची अशी दशा, मग ! मजसारख्या गरीबास तेथें कोण विचारितो ! आज सहा महिनें माझी हाजामत मुळीच झाली नाहीं. तेथील बाकीच्या सुखांत रंगून गेल्यामुळें मला त्याबाबद फारसे कांहीं वाटलें नाहीं. पण आपल्या वडीलांची हजामत फार वाढली असल्यामुळें त्यांस मोठा त्रास झाला आहे. इहलोकीं असतां आपला एक इमाम न्हावी मात्र त्यांच्या पसंतीस आला होता. त्याची ते वारंवार आठवण काढीत असतात. ते मला ह्मणाले, " बिरबला तूं तरी आमची एवढी अनूपत दुर कर तूं भूलोकीं परत जाऊन एवढी आमची आनूपत बादशहाच्या काना वर घालून, एखादा चांगला न्हावी इकडे पाठवून दे. माझ्या मनांत इकडे परत यावयाचें नव्हते पण काय करूं, आपल्या वडिलांची आज्ञा म्या सेवकानें कशी मोडावी ? तेथील सर्व सुखा स लाथ मारून निघालों, तो मेघ मंडळांतून पर्जन्याच्या धारां बरोबर काल रात्रीं ह्या जमीनीवर उतरलों, झालेली हकीगत आपणास कळविलेली आहे याउपर आपली मर्जी इमाम वर पाठवायाचा असल्यास आणखी एक महिन्यापर्यंत नवा

खर्च करण्यास नको कांकीं; मला जाण्यायेण्यास दोन दिवस कमजास लागतील, ह्मणून ते स्मशान आठ महिनें पावेतों मंत्रानें भारलें जावें असा मीं संकल्प केला होता त्याची मुदत अद्यापी एक महीना आहे चिता मात्र पुन्हा तयार केली पाहिजे ही गोष्ट बादशहास मानऊन त्यानें वडिलांची अनुपत दुर करण्याकरितां इमाम न्हाव्यास बलात्कारानें चितेंत जाळून टाकिलें ह्या प्रमाणें बिरबलानें आपल्यावर आलेलें आरिष्ट मोठ्या चातुर्यानें टाळून न्हाव्यास यथायोग्य शासन केलें. यास सांराष मनुष्य चतुर शहणा असला तर त्याजवर दुष्ट लोकांनीं आणलेलीहीं संकटें तो हर प्रयत्नानें टाळूं शकतो.

---

## गोष्ट ७ वी.

### एका कारकूनाचें चातूर्य.

---

एका गांवांतून सडक बांधीत असतां, मध्यें एक पिंपळाचा वृक्ष होता, त्याची रस्त्यास फार नड येऊं लागली, ह्मणून तो तोडण्याविषयीं सडकेच्या कारखान्या वरील मुख्य साहेबानें एकदम हुकूम फरमाविला, पण तेथील गांवकरी या-

नीं तें बहूत वर्षांचें झाड तोडण्यांविषयींची हरकत केली, ते शीलाकरून साहेबास ह्मणूं लागले कीं, जर हा पिंपळ तुटला गेला तर ह्यांजवर जो ब्रह्म संबंध आहे, त्याचा महाक्षोभ होऊन तो ह्या गांवांतील एक मनुष्यही जिवंत ठेवणार नाहीं. याजकरितां खावंदानें ह्या झाडास प्रथम कौल लावून त्यास-मंधांचा तोडण्यांविषयीं रुकार घ्यावा. तो मिळाला तर आमचें कांहींएक ह्मणणें नाहीं. पण जर रुकार न मिळतां तुह्मी जर झाडास हात लावाल, तर आह्मीं कधीं लाऊं देणार नाहीं. ह्याबद्दल सरकारानें आमचीं डोकीं मारलीं तरी चिंता नाहीं. ही त्यांची आट साहेबास कबूल करवेना कारण दैव वशांत संबंधाचा रुकार न मिळाला तर सडकेस मोठी हरकत येत होती; नंतर त्यानें आपले होतें तेवढें शहाणपण खर्चकरून त्या लोकांची समजूत घातली, तरी ते ऐकेनात, आतां त्या ठिकाणचें झाड तुटलें पाहिजे, व तें जबरीनें तोडलें तर काय अनर्थ होईल न कळे. असा तो साहेब मोठ्या विचारांत पडला. इतक्यांत त्याचा कारकून जवळ होता तो त्यास ह्मणाला, " महाराज आपला कार्यभाग तडीस जाण्याची मला एक युक्ती सुचली आहे ती मीं करून पहातों. असें बोलून तो गांवकऱ्यांकडे वळला. आणि त्यां समक्ष मीं या झाडास कौल लावून संमंधाचा रुकार

घेतला ह्मणजे झालेंना? ती गोष्ट त्यांस तत्काळ मानवली. मग त्यानें त्या पिंपळास कौल लावून विनंती केली, हे ब्रह्म पुरुषा महाराजा, हें झाड तुझें वास्तव्यस्थान खरें पण सडकेस नडत असल्यामुळें तोडावयाचें आहे. त्यांस हें जमीनीबरोबर तोडून त्याचा खालचा भाग तुला राहण्याकरितां राखून ठेऊं किंवा ह्याचीं पानें मुळें सुद्धां खणून काढिली पाहिजेत? ह्याबाबद तुझी मर्जी जसी काय असेल त्याप्रमाणें तूं डावा उजवा कळा सोड असी विनंती लावल्यावर कोणचाही कळा पडला तरी बखेड्याचा निकाल सहजच झाला!

## गोष्ट ८ वी.

### एका बादशहाचा मूर्खपणा व एका वैद्याचें चातुर्य.

अरबस्थानांतील एका बादशहाचा अंगठा लढाईत तुटला. त्याचे पदरी मोठे हकीम होते. त्यांनीं मांसवृद्धीचीं औषधें वगैरे लावून अंगठ्याचा भाग बराच वाढविला व जखम बरी केली, परंतु अंगठ्याच्या थोटकास नख येईना. तेव्हां त्यानें आपल्या पदरचे सर्व हकीम कैदेंत घातले आणि ह्मणाला, " जब इस अंगलीपर नख आयगा तब तुह्मारी छु-

टका होयगी. नही तो कभीनहीं होनेकी " तेव्हां काय करितात, आपल्या नशीबावर दोष ठेऊन मुकाट्यानें कैदेंत राहिले, इकडे बादशहानें असा क्रम चालविला कीं जो कोणी वैद्यकीचा धंदा करणार असेल त्यास बोलावून आणून असा सवाल करावयाचा यह अंगली तेरेसे अछी होयगीं? " वैद्यानें नाहीं ह्मटल्यास लागलेच कैदेंत घातलेंच व होय ह्मणून सांगितल्यास कांहीं उपचार करून पहावें, गुण नाहीं येतसा झाला ह्मणजे कैदेंत टाकावें, असा क्रम चालविला तेव्हां त्याच्या राज्यांतील सर्व वैद्यांस मोठी दहशत पडली, कितीएकांनीं हा धंदा सोडून दिला, व कितीएक पिढीजादे वैद्य हा मोठा कहर आहे असे ह्मणून छपून बसले. गांवांत व राज्यांत मोठा अनर्थ होऊन गेला. काय करावें? कोणी वैद्य नाहीं. इतक्यांत इराणांत एक हकीमाचा मुलगा नवीनच वैद्यक कर्म शिकून तयार झाला होता, त्यानें असा विचार केला कीं, परदेशांत जाऊन धंदा करावा. ह्मणजे देशही पहाण्यांत येतील. व कीर्ती वाढेल, व द्रव्य संपादन करावयाचें तेंही होईल. असा विचार करून तो ही फिरत फिरत या राजधानींत आला. तेव्हां त्यांतील कितीएक सद्गृहस्थांनीं याचे अल्पवय व विद्वत्ता पाहून. परोपकार बुद्धिनें त्यास सांगितलें कीं, येथून आपण जावें येथें बाद-

शहाच्या भितीनें कोणी वैद्य नाहींत, व भितीचें हें कारण असें आहे. येथें दुसरा कांहीं इलाज चालत नाहीं. तरी हा तेथें राहून वैद्यकी चालवूं लागला.

त्यावेळेस गांवांत कोणी वैद्य नसल्यामुळें ह्याची मोठी जारी लौकरच चालू झाली. व किर्ती वाढली. जों जों कीर्ति वाढूं लागली तों तों तेथील सद् गृहस्थ याविषयीं फार हाळ हाळत व सांगत कीं, एखादे दिवशीं बादशहाचे कानावर गेलें ह्मणजे उगीच पंचायींत होईल. अझून तरी येथून पळून जा असें त्यास सांगितलें. तरीही हा जाईना. असें होतां होतां एके दिवशीं बादशहास नवा इराणी हाकीम गावांत आल्याची खबर कळली. नंतर तावडतोब मेणा पाठऊन त्यास बोलाऊन नेलें आणि ह्मणाला, " हकीब साहेब आप इस अंगलीको ना खून, आनेकी दवा देयगे तो हम तुमारा यहसान कभी नहीं रखनेका. हें ऐकून हा ह्मणाला, " अच्छां जहांआपना इसकी दवा तो मुझे ऐसी मालूम है की, एक यांच रोजमें अंगलीपर नाखूण आवेगा, मेरे वस्तादका कहनाही ऐसा है की; यह कभी झूटा होनेका नहीं आपको तर्तीबसे दवा बनाकर देऊंगा. लेकीन उसमेका सब चिजों पैदा करके मुझे देना चाहिये. फिर जो मेरेमे आपका काम नहीं हुवा कैद या मेरा शरिर हाजर है, आप

मुखत्यार हो "तेव्हां वादशहा ह्मणतो" ऐसा खात्रीका जबाव देनेवालाभी मुझे कोई हाकीम आजतख नहीं मिला. अच्छा मैं सब चिजों पैदा करके हाजिरकर देता हूं. आप दवा बनायें, और इन सब हाकीमोंपर नक्षा करो. तेव्हां हाकीम ह्मणतो " इन्शा अल्ला हक्ताला फिर क्या रहा! मैं हाजीर हूं और अल्ला करे तो तीन दीनमें अच्छाभी होजावे लेकीन चिजों पैदा करना बडा मुष्कील काम है." हें ऐकून बादशहा ह्मणाला" क्यों मैं बादशहा होकर मेरेसे पैदा नहीं हो शकेंगी? ये कुच वडी बात नहीं क्या चिजों है सो अभी बयान करो, मैं पैदा करता हूं." तेव्हां हाकीम ह्मणतो, खुदाकि कुदरतसे क्या नहीं हो सकता? जो वह चाहे तो मुर्देकोभी जीताकर सकताहै. आपसे बिलकूल पैदा नहीं हो सकेंगे ऐसा मेरा कहना नहीं, लेकीन पहिले आप मेरेसे इतना एक करार करो और लिख द्यो, के मैने एक महिनेका अंदर चिजों पैदा करके नहीं दियो, तो तुह्मारेपर मेरा कुच दावा नहीं. और सब हकीम कैदमेंसे छोड दुंगा. फेरभी जब आप चिजों पैदा करके देवेंगे उस वख्त मैं हाजीर होकर दवा बनाउंगा. मैं आपका गुलाम है." हें ऐकून बादशहास वाटलें कीं, ह्या इराणच्या हाकीमास माझा दरारा आणि पैसे खर्चण्याची तऱ्हा यास ठाऊक नाहीं, ह्मणून हा

ह्मणत असेल. अशी काय औषधें सांगणार आहे कीं, त्याची किंमत माझ्यानें देववणार नाहीं, याची वेडी समजूत आहे असें मानून त्याच्या सांगण्याप्रमाणें जिन्नसा एक महिन्याच्या आंत मिळऊन दिल्या नाहींत तर हाकीमास सोडून देईन. असा (विचार न करितां) ठराव लिहून दिला. आणि ह्मणाले, "लिख दे अभी क्या क्या चिजावो है." हाकीमानें आपल्या मनाजोगा भरसभेंत लेख झाला असें पाहून हा षेअर (पद विशेष) ह्मणून दाखविला.

क्या अजब अना है इस नाखूनका ॥
फूल गर गूलरका हो पेषाब मच्छीका ॥

भावार्थ—जर उंबराचें फूल आणि माशाचें मूत्र मिळेल तर नख येण्याची काय अजब गोष्ट आहे? बादशहानें आपल्या वजीरास सांगून ह्या दोन जिनसांचा पुष्कळ तपास केला परंतु यांतील एकही जिन्नस मिळेना, शेवटीं मुदत भरतांच तो आपल्या मनांत खजील होऊन बादशहानें सर्व हाकीमांस सोडून दिलें, तेव्हां (त्यांतील कित्येकांस) या नव्या हाकीमानें आधींच गुप्त रुपानें हा षेअर शिकवून ठेविला होता तुह्मी सुटल्यावर बादशहाजवळ ह्मणा कीं, आह्मांस आठवण नव्हती पण हें औषध याजवर मुजरत गुण करणारें आहे (ह्या सूचनें प्रमाणें) केदेतुन सुटतांच पांच पंचवीसानें हा षेअर

ह्मणून दाखविला. तेव्हां बादशहास वाटलें कीं, हकीम खरा आहे व औषधेंहीं खरीं आहेत. परंतु कसी मिळवावीं हें कोणास ठाऊक नाहीं. असें वाटून त्याजवरही राग न करितां त्यांस व ज्यांनीं हें औषध सांगितलें त्यांस इनामें दिलीं. याप्रमाणें सर्व हकीम मुक्त झाल्यावर त्यांनीं सभा करून ह्या हाकीमाच्या आकलेची पुष्कळ स्तुती केली. व सर्वांनीं वर्गणी केली व संतोषानें त्यास एक लक्ष रुपये बक्षीस दिले. पुढें तो लौकरच स्वदेशास निघून गेला.

## गोष्ट ९ वी.

### एका भामट्याचें चातुर्य.

पुणे शहरांत ब्राह्मण लोकांची वस्ती इतर शहरच्या माना प्रमाणें पुष्कळ आहे, व पेशवायीपासून तेथें अशी चाल चालत आली आहे कीं, सायंकाळीं ते लोक देव दर्शनास गेले ह्मणजे तुळशी बाग वगैरे ठिकाणीं हौदावर संध्याकरून नंतर बिऱ्हाडीं येतात एके वेळीं एक मध्यम वयाचा श्रीमंत गृहस्थ आपला हुजऱ्या बरोबर घेऊन तुळसी बागेंत देवदर्शना करितां आला होता. त्यानें स्नानास जाते समयीं रोजच्या वहीवाटीप्रमाणें आपली शाल जोडे व अंगरखा

पागोटें वगैरे सरंमजाम हुजऱ्या जवळ देऊन त्यास शेषशाईच्या मंडपांत बसविले आणि आपण संध्याकरण्या करितां हौदावर गेला हें वर्तमान एक धुर्तठकानें पाहून तो झटकर त्या हुजऱ्याजवळ आला, आणि त्यास ह्मणाला " जा हा घे-रुपया दादा साहेबाचे मनांत कधीं यावयाचें नाहीं पण आज कसें आलें असेल तें असो येथील मंडळीस पेढे वांटावयाचे आहेत कांहीं नवसविवस असेल. एरवी कोटचे हे पैसे खर्चायला कांहींका असेना आपलें तोंड तर गोड होइल! जा लवकर कोतवाल चावडी पावेतों आणि हांहां ह्मणतां परतये माल मात्र चांगला परीक्षेनें घे शेर अच्छेर कमी मिळाला तरी चिंता नाहीं दादा साहेब तुझी फार तारीफ करीत पण आतां पहातों आणतोस कसा तो! पागोटें असूदे येथें बरोबर कसे नेसील. वेड्या सारखें नाचवीत? दे इकडे ते सारें. आणि जा लवकर, पण पळत ये हो, नाहीं तर दादासाहेबांची गांठ आहे, तुझी व माझी बरोबरच पुजा होइल, " हें ऐकून हुजऱ्यानें त्याच्या हातांतून रुपया घेऊन आपले जवळचा सरमजाम निमुटपणीं त्यांच्या स्वाधीन केला व आपण मोठ्या त्वरेनें पेढे आणावयास गेला. इकडे त्या ठकानें एका क्षणांत झटका मारून दादासाहेबास व त्यांच्या हुजऱ्यास हाळहाळ करीत ठेविले.

## गोष्ट १० वी.

### अक्कल विकणाऱ्या दुकानदाराचें चातुर्य.

कोणीएका खेडेगांवांतील मनुष्य एका शहरांत गेला होता वेथें तो बाजारांत फिरावयास गेला असतां तेथील दुकानाचा थाट पाहून तो फार चकित झाला. असा थाट त्या गृहस्थाच्या दृष्टीस पूर्वी कधींही पडला नव्हता. त्यानें दुरस्त्यानीं दुकानें पाहिलीं त्यांत अनेक प्रकारचा माल भरलेला असून विक्रीचा मोठा सपाटा चालला होता, कोणी किराणा विकतो आहे, कोणी सोनें नाणें तोलतो आहे, कोणी दुकानांत अनेक प्रकारचें जवाहीर मांडून बसला आहे, असा जो तो दुकानदार मोठ्या धांदलींत आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें, मग पहात पहात पुढें चालला तो एका ठिकाणीं एक मनुष्य लोडाशीं टेंकून बसलेला त्याच्या दृष्टीस पडला, त्याच्या पुढें माल वगैरे कांहींएक मांडलेला नव्हता. पैसे ठेवण्या करितां एक पेटी मात्र बाजूस ठेविली होती. तें पाहून गृहस्थ मनांत ह्मणूं लागला कीं ह्याच्या एकंदर अविर्भावावरून हा कोणी तरी दुकानदार दिसतो, पण ह्याच्याजवळ कोणताही माल दिसत नाहीं. सुंदर बैठक टाकलेली असून तिजवर कित्येक तक्ते मात्र ठेविले आहेत हें

कशाचें दुकान असावें वरें? तो आपल्या दुकानाकडे पाहून कांहीं विचार करितो आहे. असें पाहून दुकानदारानें त्यास हाक मारिली, आणि ह्मटलें "अहो इकडे या, तुह्माला कसचा विचार पडला आहे? गृहस्थानें उत्तर केलें नाहीं विचार कशाचा पण हें दुकानच आहे काय? येथें कांहीं माल तर मांडलेला दिसत नाहीं, दुकानदार ह्मणाला "बाबा हें अकलेचें दुकान आहे. येथें कांहीं मांडण्याची गरज नाहीं. मी बसलों आहें येवढा पुरे" गृहस्थ ह्मणाला काय हें अकलेचें दुकान आहे! हें बुवा आज आपण एक अपूर्वच पाहिलें कोण आपण अक्कल विकित असतां काय ती कशी देतां दुकानदार ह्मणाला बाबा विचारतोस काय ह्या दुनियेंतील मनुष्यांस निर्वाहाकरितां जशी अनेक वस्तूंची गरज लागते, तशींच संसारांतील अनेक प्रकारचीं संकटे दूर करण्या करितां अकलेची गरज लागते. या शहरांत कोणास कांहीं अडचण पडली ह्मणजे तो लागलाच धांवत माझे दुकानीं येतो आणि त्याच्या संकटाच्या महत्वा प्रमाणें मी त्याज पासून पैसे घेऊन त्यांतून पार पडण्याची तजवीज त्यास सांगतों ह्याचें गृहस्थास मोठें आश्चर्य वाटून तो त्यास ह्मणाला शेटजी मी खेडेगांवांतील मनुष्य हें शहर पाहण्याकरितां आलों आहें. प्रस्तुत मजवर कोणता मोठा अडचणीचा

प्रसंग पडला आहे असें नाहीं. परंतु आपल्या दुकानाचें मला फार नवल वाटल्यावरून मी आपल्याजवळ इतकीच विनंती करितों कीं, आपल्या अकलेचा दर कसाही असो, पण मला दोन आण्याची देऊन ठेवा, मग तिचा उपयोग झाला तर झाला नाहीं तर माझे दोन आणेच जातील असें ह्मणून त्यानें आपले खिशांतून एक चवली काढून दुकानदारा पुढें टाकिली. तेव्हां तो किंचित गालचेगालांत हसून गृहस्थास ह्मणाला " बरें तर पुढें ये मी अकल देतों ही नीट लक्षांत ठेव. ती अशी कीं, तूं हे शहर पाहावयास आला आहेस पण येथें अनेक प्रकारचे लबाड लोक रहात असतात; याजकरिता तूं कोणाशीं कज्जाकफावत करूं नको, व रस्त्यांत कोठें भांडण चाललें तर तेथें क्षणभर देखील उभा राहूं नको हें ऐकून गृहस्थ ह्मणाला शेटजी ह्या असल्या पोकळ गोष्टी व उपदेश मी शेकडों वेळा ऐकल्या आहेत. नुसते चार शब्द तुम्ही मला सांगितले, एवढ्या बद्दलच मी आपले पैसे तुम्हास देऊं काय? मला कांहीं येथें धंदा रोजगार नाहीं मी खेडे गांवांतील मनुष्य केवळ शहर पाहण्याकरितां आलों आहें ह्मणून मघाशींच तुह्मास सांगितलें नाहीं काय? मला येथल्या लोकांशीं कोठें कज्जेकफावती करावयाच्या आहेत तुह्मी अकल विकतां ह्मणून सांगितल्यावरून मी दोन आणे

तुह्मास दिले, पण जर तुमची अक्कल याच प्रकारची असेल तर ती घेऊन मला गरिबाला काय करावयाचें आहे दोन आण्याचा खाऊ घेऊन गेलों तर माझीं मुलें आनंदानें तरी खातील, मला नको तुमची अक्कल; द्या माझी चवली परत. दुकानदार ह्मणाला ही कांहीं व्यापाराची रीत झाली? एकदां माल घेऊन वापरला ह्मणजे दुकानदार काय परत घेत असतो? गृहस्थ ह्मणाला "गोष्ट खरी; पण मी तुमचे पासून कांहीं माल घेऊन वापरला कीं काय. दुकानदार ह्मणाला "अरे पण माझें अक्कलेचें दुकान आहे त्या पेक्षां अक्कल हाच माझा माल" गृहस्थ ह्मणाला "शेटजी खरें; पण तुमचा माल मी मुळींच वापरला नाहीं. मग तो परत घेण्यास काय चिंता आहे? मी येथून हाललों तरी आहें काय? दुकानदारानें विचार केला कीं; ह्या अडाणी मनुष्या-बरोबर भांडून परिणाम लागणार नाहीं. उगाच श्रम मात्र होतील ते कशाला! असा विचार करून तो गृहस्थास ह्मणाला "हे घे आपले दोन आणे परत आणि दे माझी अक्कल. पण परत देणें ह्मणजे काय हें समजलासनां? मी जें तु-ह्माला शिकविलें आहे हें लक्षांत ठेवणार नाहीं असें शपथ पूर्वक सांग. गृहस्थानें त्या प्रमाणें करून आपले दोन आणे घेतले आणि चालता झाला. कांहीं पुढें गेला तों

एके ठिकाणीं मोठी आरडाओरड चाललेली त्याच्या कांनीं आली. ती कशाची आहे हें पाहण्या करितां तो पुढें गेला. तों दोन असामी श्रीमंत गृहस्थ एकमेकांस हाणमार करितांना त्याच्या दृष्टीस पडले, मग त्यांची मौज पहात तो त्या ठिकाणीं उभा राहिला. इतक्यांत एकाएकीं पोलीसाचे शिपाई धांवत येऊन त्यांनीं त्या त्या भांडणारांस व साक्षीकरितां जवळच्या कांहीं मनुष्यांस पकडून कोतवालाकडे चालविलें, तेव्हां गृहस्थास फार भीति पडली. तो मनांत ह्मणाला "पहा जर त्या शेटजीनें मघांशीं सांगितलेली अक्कल ऐकिली असती तर अशा संकटांत कां पडलों असतों ? बिऱ्हाडीं जेवणास अंमळ उशीर होता, ह्मणून कर्मणुकीकरितां बाजारांत आलों. तों ह्या यमस्वरूपी शिपायांच्यापाशांत पडलों. आतां लौकर कसची सुटका होते खरें बोलण्याकरितां मार मिळाला नाहीं ह्मणजे या देहाचें भाग्य समजावयाचें, ह्या अनोळखी ठिकाणीं आपला वशीला तरी आहे काय किंवा तूं अमुक अमुक रीतीनें वाग, असें सांगण्यास तरी कोण आहे काय असो, आतां काय होईल तें होवो. असा विचार करीत तो शिपाया बरोबर चालला आहे. इतक्यांत पूर्वींचें अक्कलेचें दुकान त्याच्या दृष्टीस पडलें. तें पाहतांच त्याच्या

मनांत आलें कीं आतां येथें तर आपलें दुसरें कोणी नाहींच. पण ह्या अक्कल विकणारानें कांहीं विचार सांगितला तर सांगितला मग दोन आण्याच्या ठिकाणीं चार आणे पडले तरी चिंता नाहीं असें मनांत आणून त्यानें बरोबरच्या शिपायां पैकीं एकाच्याहातीं दोन आण्याचे पैसे मुकाट्यानें देऊन अक्कल वाल्याचे दुकानांतून जाऊन येण्यास परवानगी मागितली. आणि तेथें जाऊन तो दुकानदारास ह्मणाला, "शेटजी; मी अशा अशा संकटांत पडलों, ह्या वेळेस माझें रक्षण करा आपण मला एकदां दिलेली अक्कल ती केवळ मूर्ख पणानें परत केली त्याची क्षमा करा; आणि आतां या संकटांतून माझी लवकर सुटका होईल अशी कांहीं तरी अक्कल सांगा, ह्या बद्दल जें जें मागाल तें देईन पण आतां उशीर करूंनका. तो पहा शिपाई तेथें वाट पहात उभा आहे" हें ऐकतांच दुकानदार ह्मणाला "बरें तर दोन रुपये काढ. आणि मी सांगतों हें ऐक. तुला या शिपायानें कोतवाला पुढें उभा केल्यावर तुला तो जें जें विचारील त्याचें उत्तर तूं अगदीं भलतेंच दे' ऊठ आतां हो चालता- मग शिपायांनीं सर्वांस कोतवाला पुढें नेलें. तेव्हां तो खटल्याची चौकशी करीत असतां या गृहस्थास विचारूं लागला "तूं ह्यांस भांडतानां पाहिलेस कीं नाहीं त्यानें उत्तर

केलें, महाराज, मीं उद्यां निघून जाणार आहें "कोतवाल ह्मणाला, मी कधीं निघून जाणार ह्मणून विचारिलें नाहीं ह्या दोघांची मारामार चालली असतां तूं जवळ होतास कीं नाहीं." गृहस्थानें उत्तर केलें "महाराज माझा गांव येथून दहा कोशावर आहे" हें ऐकून कोतवाल ह्मणाला, "काय मूर्ख आहे रे! तुझा गांव कोण विचारितो आहे! ह्यांची मारामार चालली असतां तू जवळ होतास कीं नाहीं गृहस्थानें उत्तर केलें, "महाराज मला येथें येऊन दोन महिने झाले" हें ऐकतांच कोतवाल अतिशयीत रागावून शिपायांस ह्मणाला "अरे तुह्मी या दिवाण्या मनुष्यास येथें कशाला आणिलें? ह्या ह्याला हांकून, असें ह्मणतांच एका शिपायानें पुढें होऊन त्यास चावडींतून हांकून लाविलें तेव्हां गृहस्थास आपली सुटका झाली ह्मणून फारच आनंद झाला आणि त्या अक्कल विकणाराची पुष्कळ तारीफ करून तो आपले बिऱ्हाडीं निघून गेला.

## गोष्ट ११ वी.

### चोरी पकडण्याची युक्ती.

एकासमयीं वसंतऋतूचे दिवसांत विहारबागांत कचेरी करण्याचा हुकूम बादशहानें केला असतां बाग अत्यंत रम-

णीय त्यांत एक मनोहर परम सुशोभित असा बंगला होता त्यांत तऱ्हेतऱ्हेचे विराजमान आरास करून रुजाम्याचे बिछायतीवर सुशोभीत नानातऱ्हेची वेलबुटीचे गालीचे आंथरून विस्तीर्ण जागेंत कचेरीचा थाट केला तेथें संपूर्ण वजीर सरदार आणि उमराव तसेच सावकार आदिकरून मोठमोठे लोक यथानुक्रमानें येऊन बसले आणि बादशहा गादीवर बसला असतां ती सभा विराजमान दिसती झाली. बादशहा समीप बिरबल बसून न्यायमनसुबी दोन घटिका चालली असतां तेथें एक सौदागर फिर्याद आला त्यानें आपले फिर्यादीची हकीगत अर्जांत लिहून, तो अर्ज बादशहा समोर टाकिला. तेव्हां बिरबलानें तो अर्ज घेऊन बादशहास वाचून दाखविला त्यांतील हांशील मजकूर असा होता कीं, मी माळवा देशांतील राहणारा असून बंगाल देशांत व्यापारास्तव गेलों होतों. तेथें एका सावकाराजवळ राजहंस पक्षी पाहिला. तो फार सुंदर आणि अत्यंत विराजीत असा दृष्टीस पडला. तो खावंदाचे मंदिरांत असण्यास योग्य असें मनांत आणून त्याचे मालकास त्या पक्षाची किंमत एक सहस्र रुपये देऊन खावंदास नजर करण्याकरितां घेऊन आलों घरीं आणून पिंजऱ्यांत ठेविला असतां माझे चाकर मनुष्यांतून कोणी एका दुर्जनानें तो

पक्षी चोरून नेऊन त्यास मारून भक्षण केला असावा. असें चौकशीचे मानावरून दिसत आहे. या वरून तो पक्षी कोणी नेऊन मारिला ह्याविषयींची चवकशी होऊन चोर पकडला पाहिजे, याप्रमाणें ऐकून बादशहानें त्याची चाकर मनुष्यें आणून चौकशी केली त्यांत कांहीं मुद्दा व संदर्पही लागला नाहीं तेव्हां त्यां मनुष्यास सोडून दिलें त्यासमयीं तो सौदागर फार खिन्न होऊन बिरबलाकडे दीनवदन अवलोकन करून येथें न्यायमनसुबी कांहींच नाहीं असें त्याचें बोलणें ऐकून बिरबलानें पुन्हां त्याचे चाकरलोक कचेरींत आणून उभे केले. आणि चवकशीस कांहीं अवकाश करून बोलता झाला, कायहो ? या चोराचें धारिष्ट तरी आहे पक्षी मारून भक्षण केला आणि त्याचें पीस पागोट्यांत खोंचून कचेरीस आला आहे, आणि चोरें कर्म केलें असें नाकबूल करितो असें बिरबलाचें भाषण सर्व लोकानीं श्रवण केलें त्यांत ज्या मनुष्यानें पक्षी मारिला होता त्याचे मनास असें वाटलें कीं, न जाणो चुकून आपले पागोट्यांत पीस आलें आहे काय! असा संशय भासून भयानें देहभान जाऊन कोणाचे लक्षांत न येण्यासारखें पागोट्यास हात लाऊन पाहता झाला तें कोणीही पाहिलें नाहीं आणि ध्यानांत ही धरिलें नाहीं परंतु बिरबलानें त्या सर्व चाकर

मनुष्यांवर नजर ठेविली होती त्यामुळें तें कृत्य त्यास दिसून आलें तेव्हां तत्क्षणींच ह्या मनुष्यास पकडून मार देण्यास काढिलें तेव्हां तो माराचे भयानें सर्व कबूल होऊन हंसाचीं पिसें छपवून ठेविलीं होतीं तो मुद्दाही दाखविता झाला याप्रमाणें चतुराईनें चोर पकडला. तेव्हां सर्व कचेरींत बिरबलाची वहावा होती झाली तदनंतर कचेरी बरदास्त करण्याचा हुकूम बादशहानें केला त्या समयीं सर्व लोकांस विडे, पानसुपारी, आणि हार, तुरे, गजरे, तसेंच सुवासीक गुलाबपाणी पाच मोतीया आदिकरून परम सुवासीक अत्तरें सर्वांस देत असतां खालीं अत्तराचा बिंदू पडला तो पुसून घेऊन अत्तरदाणींत भरला असें बादशहानें लक्षांत आणून तो बिंदू बोटानें घ्यावयास लागला परंतु तो तत्काळ बिच्छायतीस जिरून जाऊन हस्तगत झाला नाहीं. परंतु हें कृत्य बिरबलानें पाहिलें तो आतां कांहीं तरी दूषण ठेवील असें मनांत आणून दुसरे दिवशीं आपलें औदार्य बिरबलास दाखविण्याचे इराद्यानें पाण्याचा हौद मोकळा करून तो संपूर्ण अत्तरानें भरविला आणि सर्व शहरांतील लोक बोलावून त्याजकडून तो लुटविला त्या लुटीची मजा दाखविण्याचे निमित्यें बिरबलास आपले बरोबर घेऊन बादशहा त्या हौदा जवळ आला. आणि बिरबलास ह्मणाला क्यौं बिर-

बल कैसी मज़ा आहे बिरबल ह्मणाला खुदावंत तक्षीर माफ होना बुंदसे वैसाहो बुंदसेना आती या प्रमाणें बिरबलाचें भाषण ऐकून बादशहास मोठा क्रोध आला, आणि मनांत ह्मणाला माझा हलकेपणा यानें प्रसिद्धीस आणिला परंतु आपले पासून गोष्ट झाली सबब क्रोध उघड दाखविण्यास अडचण दाखवून असेंच मनांत ठेविलें. उपरांत कचेरी बरखास्त होऊन सर्व लोक घरोघर निघून गेले.

दुसरे दिवशीं क्रोधामुळें बादशहानें बिरबलास नजरबंद केला. आठ चार दिवस झाले तरी नित्य सांप्रदायाप्रमाणें बादशहाचें बोलावणें नाहीं. तेव्हां गैर मर्जी झाली असावी असें जाणून बिरबलासही क्रोध येऊन दिल्लीशहर सोडून रुसून गेला. आणि बादशहास आपला ठिकाण न लागावा ह्मणून दूरदेशीं मालवण प्रांतांत एके खेडे गांवीं जाऊन एका कुणब्याचे घरीं बिऱ्हाड घेऊन आपलें नांव आणि गुण प्रगट न करितां गुप्तपणी राहता झाला. या गोष्टीस चार सहा महिनें लोटले, अकबरबादशहानें बिरबलास कामावरून दूर करून मुलखांतून काढून लाविला. असा चारी मुलखांत पुकार झाला. त्या योगानें बादशहाचे शत्रुजन यांनीं विचार केला कीं, अकबराचा प्रधान बिरबल तो अक्कलवान असल्यामुळें आजपर्यंत आपला इलाज चालला नाहीं

सांप्रत तो अकबराजवळ नसून त्याचा ठिकाण नाहीं. याकरितां आतां त्याचें राज्य घेण्यास फारसे प्रयास नको. असा शत्रूनें विचार योजिला आणि लढाई करण्याच्या मसलती चालविल्या त्या सर्व अकबरास कळून आल्या. तेव्हां अकबर चिंताक्रांत होऊन बिरबलाचा शोध करिता झाला परंतु कोठेंही ठिकाण लागेना, असें झालें तेणेंकरून काळजींत पडला हें वर्तमान तुर्कस्थानचे बादशहानें ऐकून लढाई करण्याचें योजिलें परंतु प्रथम अकबराची अक्कल तोलण्याकरितां एक पत्र लिहून स्वारावरोबर पाठविलें. त्यांत असें लिहिलें कीं, एक घडाभर अक्कल चार महिन्याचे आंत पाठवून द्यावी. हें काम न होईल तर लढाईस तयार व्हावें. याप्रमाणें पत्र घेऊन सांडणीस्वार आला. त्यानें अकबरास पत्र दिलें. तें पाहून अकबर मोठ्या विचारांत पडून मनांत ह्मणाला बिरबलाशिवाय या कामाची तजवीज व्हावयाची नाहीं. आणि बिरबलाचा तर कोठें थांग लागत नाहीं. आतां यास काय करावें? नंतर बिरबलाचा शोध लागण्यास एक युक्ती काढिली. ती अशी कीं गांवोगांव एक एक एडका पाठवून दिला. आणि तेथील अधिकारी यास हुकूम असा केला कीं, एडका वजन करून पाठविला आहे. यास दररोज चंदी वयरण ह्मणून पांचशेर सरका-

रांतून चारली जाईल. याप्रमाणें एक महिना झाला, ह्मणजे हल्लीं एडका जितका वजन आहे, तितकाच महिना अखेर भरला पाहिजे. कमजास्ती वजन भरल्यास प्राणांत शिक्षा मिळेल. याप्रमाणें हुकूम लिहून गांवोंगांवीं एक एक एडका आणि एक एक मनुष्य बरोबर देऊन एक महिन्याची चंदी वैरणीं सुद्धां बादशहा पाठविता झाला. तेव्हां ज्या गांवांत बिरबल होता त्या गांवीं एडका आणि हुकूम आला. तेव्हां बिरबलानें मनांत आणिलें कीं ही तजवीज माझे शोधार्थ बादशहानें केली आहे, यास्तव आतां युक्तिनें प्रगट व्हावें असें मनांत आणून त्या गांवचे वेणाजीनामक पाटलास सांगितलें कीं, तुमच्या आश्रयास आजपर्यंत मी राहिलों. त्या उपकाराचा उपयोग कांहीं मजपासून घडला नाहीं यास्तव सांप्रत तुह्मावर संकट प्राप्त झालें आहे, त्याचे निवारणाची तजवीज मजला सुचली आहे, ती सांगतों. त्याप्रमाणें करा ह्मणजे संकट दूर होईल, असें ऐकून वेणाजी पाटील ह्मणाला एवढी तजवीज काढल्यास तुमचे उपकार जन्मभर आठवीन. बिरबल ह्मणाला, तुमचे गांवांत दरवेशी आहे त्यानें सांपळ्यांत वाघ ठेविला आहे, त्या वाघा समोर येडका क्षणभर बांधावा ह्मणजे त्याच्या भयामुळें दररोज दाणा वयरण खाऊन रक्तवृद्धी होईल, ती शोषण होऊन व्यर्थ जाईल

आणि हल्लीं एडका जितका वजन आहे तितकाच महिना अखेरीस वजन राहील. कमीज्यास्ती होणार नाहीं पणहीं तजवीज मी सांगितलें असें कोणास समजूं न द्यावें याप्रमाणें पाटिलानें ऐकून तशीच तजवीज चालविली असतां महिना अखेरीस एडका पहिले इतकाच वजन भरला तो बादशहाकडे नेऊन हजर केला बादशहानें गांवोगांवचे एडके वजन केले ते कमीजास्त भरले वेणाजी पाटील यानें आणिलेला मात्र बरोबर भरला. त्यावरून वेणाजींचेच गांवीं बिरबल असून त्याचे अक्कलेचे तजविजीनें हें काम झालें असावें असें खचीत समजून त्या पाटलास खरें वर्तमान विचारितां त्यानें सांगितलें कीं, आमचे घरीं फिरस्ता पाहुणा आहे त्यानें सांगितल्या प्रमाणें केलें. असें ऐकून बादशहानें तात्काळ सेवक आणि सरंजाम पाठऊन मोठ्या इतमानानें बिरबलास आणिलें आणि नवीन इनाम सरंजाम देऊन दिवाणगिरीचीं वस्त्रें तत्काळ देऊन हुद्यावर नेमिला नंतर तुर्कस्थानचे बादशहा कडून आलेलें पत्र त्यास दाखऊन घडाभर अक्कल पाठविण्याची तजवीज करण्यास सांगितली. त्याऊपर बिरबलानें एक कडू भोपळ्याचें आळें घातलें, तें कांहीं दिवशीं लागास येतांच त्याचे एका फळास बाहेरून घागर लाऊन त्या घागरींत तें फळ वाढे अशी तजवीज

केली नंतर तें फळ दिवसेंदिवस वाढून मोठें होत होत घागरभर पसरून घागरीचे तोंडा बाहेर जुडखा निघाला. आणि तें फळ पक्कंजून झालें तेव्हां घागरीचे तोंडास मजबूत कपडा बांधिला आणि बादशहास सांगितलें कीं, घडाभर अक्कल तयार झाली आतां तुर्कस्थानचे बादशहाकडे रवाना करावयाची असें सांगून बिरबलानें त्यास तात्काळ पत्र लिहिलें त्यांत मजकूर असा लिहिला कीं, घडाभर अक्कल सबंध पाठविली आहे तर घड्यास धक्का न लागतांच आणि अकलेचा चूर न करितां सबंधचे सबंध अकलेचा गट्टा काढून घेऊन घडा परत पाठवून द्यावा. असें न होतां घड्याचा अगर अकलेचा नाश केल्यास सदहू अकलेची किंमत तीन कोट रुपये पाठवून द्यावी. याप्रमाणें न होईल तर युद्धास सिद्ध व्हावें. आह्मांकडून तयारी आहे याप्रमाणें पत्रांत लिहून बादशहाची मोहर करून तें पत्र अकलेच्या घड्यास उंची वस्त्राचीं वेष्टणें लाऊन तो स्वारा बरोबर देऊन तुर्कस्थानचे बादशहाकडे पाठविला. तेव्हां स्वारानें नेऊन तेथील, बादशहाकडे प्रविष्ट केला. तेव्हां त्यानें आलेलें पत्र वांचून पाहिलें आणि आपल्या मुत्सदी दिवाण, सरदार, उमराव आदिकरून प्रमुख प्रमुख बोलावून आणून त्यांस पत्रांतील हांसील मजकूर कळविला. आणि तो अकलेचा

घडा मोकळा करून सर्वांस दाखविला व सबंध अकल काढून घेण्याची तजवीज करून पहावयास लागले परंतु कांहीं इलाज चालेना तेव्हां अकबराचे दरबारीं अकलवान लोक आहेत असें समुच्यायास येऊन ह्मणतात आकबर ह्याची चटाई दिसते लढाईचा प्रसंग केला असतां तो जबरदस्त आहे. आपला परिणाम लागणार नाहीं अक्कल सबंध काढून घेऊन घडा परत पाठविण्याचें अवघड काम आहे त्यापेक्षां तीन-कोट रुपये द्यावे हें चांगलें असा सर्वांचे मतें इत्यर्थ ठरून तीन कोट रुपये आकबर बादशहाकडे पाठऊन दिले आणि तह करून घेतला याप्रमाणें बिरबलाचा उपयोग अकबरास हमेशा होत असे.

## गोष्ट १२ वी.

एके दिवशीं बादशहा आणि राणी उभयतां रंग महालांत विषयानंदें क्रीडत असतां राणीची शरीर प्रकृती त्या दिवशीं बरोबर नसून भोजन विशेष झालें होतें त्यांत वातूळ पदार्थ विशेष सेवनांत आला होता या मुळें गुदद्वारें वायु सरला त्यानें दुर्गंधी चालली तें बादशहानें पाहून क्रोधयुक्त होत्साता तात्काळ राणीस रंग महालांतून बाहेर काढून

लाविता झाला आणि नजर बंद शिक्षा देऊन राजवाड्या बाहेर गांवांत बंगला होता त्यांत राहण्यास सांगितलें तद- नंतर दुसरे दिवशीं बादशहा कचेरींत येऊन कचेरीचे लोकां- स पृथक् पृथक् विचारिता झाला कीं तुम पादतेहो. त्यांनीं श्रवण केलें होतें कीं राणीसाहेब पादल्यामुळें तिजवर इतरा- जी झाली यास्तव बादशहाचें भाषण ऐकून प्रत्येकानें सांगि- तलें हमपादते नहीं.—असें सांगितल्यावरून त्याजवर प्रसन्न मर्जी असती झाली त्यादिवशीं बिरबल कचेरीस आला नव्ह- ता या मुळें त्यास विचारणें राहिलें नंतर कांहीं दिवसांनीं होताच बिरबल ह्मणाला सब दुनया पादते वैसा हमबी पादते या प्रमाणें बादशहानें ऐकून क्रोध करून म्हणाला कचेरीके सब लोक पादते नहीं. और तुम कैसा पादते तो कचेरीमें विनाहोकम मत आव. याप्रमाणें बिरबलावर ही गैर मर्जी झाली होती. तद्नंतर कांहीं दिवसानें राणीनें बिरबलास बोलावून नेऊन बादशहाची आपलेवर गैर मर्जी होण्याचें कारण सर्व कळविती झाली. आणि काकूलती येऊन हात जोडून ह्मणाली कीं स्वावंदाची आणि माझी पूर्वी सारखी प्रिती होण्याची तजवीज तुजवांचून दुसऱ्याचे हातून व्हावयाची नाहीं यास्तव मेहरबानी करून आमचा उभयतांचा एकपणा होईल असें करावें, याप्रमाणें राणीचे

बोलणें ऐकून बिरबल ह्मणाला मीही पादतों ह्मणून सांगितलें, त्याजवरून मजवरही गैरमर्जी झाली आहे. राणी ह्मणाली तुजवर गैरमर्जी असली तथापि तूं चतुराईनें सर्व तजवीज करशील. तेव्हां बिरबल ह्मणाला या कामास लक्ष रुपये पाहिजे असें ऐकतांच राणीनें तात्काळ लाख रुपये बिरबलाचे पदरीं घातले नंतर बिरबलानें एक कारागीर सोनार अत्यंत कुशल पाहून त्यास सांगितलें कीं, जसें शाळूचें कणीस भरदार असतें. त्याप्रमाणें बावनकशी सोन्याचे कोंदणांत अत्युत्तम ढाळदार अशी चांगली उत्तम अछेद घोंसदार मोत्यें बसवून हुबेहूब कणीसच काय? असें मोजेचें कणीस सुंदर तयार करून द्यावें द्रव्य लागेल तितकें खर्च करण्यास हरकत नाहीं याप्रमाणें सांगितलें तदनंतर त्या कारागिरानें सांगितल्यापेक्षांही अति उत्तम कणीस बनवून बिरबलाचे स्वाधीन केलें.

बिरबलानें तें मोत्याचें कणीस घेऊन कचेरीस आला. आणि बाहेरून बादशहास वर्दी कळविली ती कांहीं मोठे कारणास्तव खावंदाची भेट घेण्यास परवानगी मागत आहे. असें सांगून परवानगी दिली. तेव्हां कचेरीस जाऊन मोत्याचें कणीस अति सुंदर आणि अमोल्य द्वीपांतराहून आणिलें आहे. चांगल्या भूमीवर चांगल्या रीतीनें चांगले

मनुष्याचे हातून पेरलें असतां शाळूसारखें शेत उगवून त्याजवर अशींच मोत्यांचीं कणसें येतात. याजकरितां हें आपले सारखे श्रीमान लोकांशिवाय दुसऱ्याच्यानें व्हावयाचें नाहीं. आणि त्याची तजवीज जशी कशी पाहिजे तशी दुसऱ्याचे हातून होणें अवघड यास्तव खावंदांनीं हें काम अवश्य केलें पाहिजे आणि खावंद करण्यास योग्य आहेत या प्रकारें ऐकून बादशहास मोठा आनंद होऊन मोत्याचें शेत करण्याचें मनांत पक्कें ठसलें नंतर बिरबलास हुकूम केला कीं, या शेतास जमीन चांगली कशी असावी ती नेमून देऊन नांगरून तयार करवावी, असा हुकूम होतांच बिरबलानें सर्व शहरांत फिरून जमीन नेमिली ती जेथें त्याचें अनहीत करण्याचीं घरें व मोठ्या इमारती होत्या ती जागा नेमून बादशहाकडून त्याच्या इमारती मोडण्याविषयीं एकंदर हुकूम आणिला तो असा कीं, जी जागा योग्य दिसून येईल, तेथील इमारती वगैरे अडचणी असतील, त्या काढून टाकाव्या. असा एक सहीचा हुकूम आणून बिरबलानें आपले दुर्जन आणि शत्रु यांच्या मोठ्या मोठ्या हवेल्या होत्या ती ती जागा नेमून हवेल्या मोडण्या विषयीं बादशहाचा हुकूम त्यास दाखविला. त्यासमयीं ते लोक बिरबलाचे कानीं लागून बोलते झाले कीं, शेख पागोळ्याबद्दल आह्मां जवळून कांहीं

द्रव्य नजर घेऊन आमच्या इमारती बचविण्याची तजवीज करावी. असें त्यांचें बोलणें ऐकून कोणापासून पांच हजार कोणापासून दहा हजार पंचवीस हजार असे रुपये रोख घेतले. ते एकंदर दोन तीन लक्ष जमा झाले. नंतर लोकांची घराची जागा सोडून हलक्या इमारती त्याची किंमत त्या त्या गरीब लोकांस देऊन दोन बिघे जमीन तयार केली आहे त्यास कचेरींतील सर्व लोक समागमें घेऊन स्वतः खावंदानें तेथें आलें पाहिजे. याप्रमाणें कळवून मंडळीसहीत बादशहास तेथें आणिलें नंतर बिरबल ह्मणाला खुदावंत हें काम मोठें महत्कृत्य आहे हीं मोत्यें पेरणारा मनुष्य शुचिर्भूत निर्मळ पाहिजे घाणेरे मनुष्यानें पेरिलीं असतां उगवणार नाहींत त्याजकरितां जो मनुष्य पादत नसेल त्याचे हातून पेरणी झाली पाहिजे आपले पदरीं न पादणारे लोक पुष्कळ आहेत, त्यांतून हर कोणास हुकूम होऊन योजावा. याप्रमाणें बादशहानें ऐकून एक एक असामीस बोलावून मोतीं पेरण्याविषयीं सांगितलें. जो तो ह्मणं लागला मी पादतों असें ह्मणून कोणी मोतीं पेरण्याचें कबूल करिनासा झाला. याप्रमाणें तेथें हजारों लोक होते, त्या सर्वांनींही पेरण्याचें नाकबूल केलें बादशहाचे मर्जीस्तव पादत नाहीं असें ह्मणून मोतीं पेरलें असतां उगवलीं नाहींत ह्मणजे सर्व खर्च भरून

घावा लागेल आणि समयीं डोकें मारलें जाईल. याजकरितां कोणीही पेरण्यास सिद्ध झाला नाहीं, आणि पादल्याशिवाय कोणीही मनुष्य नाहीं हें खरेंच असल्यामुळें सर्व लोक मागें सरले तेव्हां बादशहा ह्मणाला अबी बिरबल तुम पादते, बिरबल ह्मणाला, खावंद हम पहिलेच पादते, वैसा कहदीयाहैं. पण पूर्वी सर्व लोकांनीं पादत नाहीं असें खावंदाचे जवळ कबूल केलें असून हल्लीं एकही न पादणारा कोणी आढळत नाहीं हें आश्चर्य आहे. आतां सर्व लोक पादणारेच ठरले, परंतु खावंद जातीनें तर न पादणारे आहेत यास्तव स्वतः मोतीं पेरण्याचें काम जातीनें केलें पाहिजे. याप्रमाणें ऐकून बादशहा ह्मणाला बिरबल सुनो हमबी पादते. सब दुनयामों पादेबिना कोईबी निकलनेका नहीं याप्रमाणें बादशहाचें बोलणें ऐकून बिरबल ह्मणाला खुदावंत सुनो हम पादते सब दुनया पादते फेर हमने और राणीसाहेबनें क्या चोरी किया गुन्हेगारी किया है जो उसको और हमको नजरबंद करें है या प्रमाणें बिरबलाचें भाषण ऐकून बादशहा मनांतील क्रोध सर्व सोडून राणीचा अंगिकार पूर्ववत प्रमाणें करिता झाला आणि बिरबलास दिवाणगिरीचे कामांवर पहिलेप्रमाणें नेमिता झाला.

# गोष्ट १३ वी.

## ( उद्योग व चातुर्य. )

अमेरिका खंडांतील एका शहरांत मि० ली नांवाचा एक सुतार रहात होता. हा सुतार चांगल्या स्वभावाचा आणि मेहनती होता इतकेंच नाहीं, परंतु तो आपला धंदा इतक्या हुषारीनें करीत होता कीं, त्याच्या उत्पन्नांतून, सर्व कुटुंब खर्च भागून आणि आपल्या हरमन नावाच्या मुलास उंच-प्रतीचें शिक्षण देऊनही त्याजवळ पुष्कळ पैसे शिल्लक होते.

तरुण हरमन जेव्हां पंधरा वर्षांच्या वयाचा होता तेव्हां शहरांतील एका शाळेंत तो जात असे. त्या शाळेंत उंचप्रतीचें शिक्षण मिळत असे, परंतु दुसऱ्या साधारण शाळांपेक्षां ह्या शाळेंत शिकण्याकरितां पुष्कळ पैसे द्यावे लागत; ह्मणून श्रीमंत लोकांचीं मुलें मात्र शिकावयास येत असत.

वर लिहिल्याप्रमाणें मि० ली चांगल्या स्थितींत असल्या-मुळें आपल्या मुलास उंच प्रतीचें शिक्षण देण्यास, आणि त्या-शिवाय आपल्या कामास मदत करण्याकरितां कांहीं उमेद-वार ठेवण्यास समर्थ होता. त्यानें कित्येक उमेदवारांजवळ सात आणि कित्येकांजवळ तीन वर्षांची मुदत करून असा ठरा-

व केला कीं, मी तुह्मांस ठरविलेल्या मुदतीपर्यंत फक्त खाणें-पिणें, कपडे देऊन सुताराचा धंदा शिकवीन, आणि त्याबद्दल तुह्मीं ठरविलेल्या मुदतीपर्यंत माझ्या हुकुमांत राहून मी सांगितलेलें सर्व काम काज करावें.

उमेदवारांत जेम्स वॉल्स नांवाचा एक उमेदवार होता, जेम्स हा फक्त तेरा वर्षांच्या वयाचा होता, तरी तो फारच बुद्धिमान् व मेहनती होता. तो विद्या शिकण्याची फारच इच्छा करीत असे, परंतु त्याचे आईबाप इतक्या गरीब स्थितींत होते कीं, ते त्याचें पोषण करण्यास समर्थ नव्हते. जेम्स ह्यास थोडें लिहितां वाचतां येत होतें. तथापि आपल्या एकुलत्या एक मुलास उत्तम प्रकारचें शिक्षण मिळावें अशी जरी त्यांची बहुत इच्छा होती, तथापि त्यांच्या गरिबीमुळें ती इच्छा व्यर्थ होऊन, सात वर्षें खाण्यापिण्यास व कपडे देण्याचें कबूल करून घेऊन मि० ली ह्याचे दुकानावर सुताराचा धंदा शिकविण्यास ठेवण्याचें त्यांस भाग पडलें.

एके दिवशीं जेम्स आपल्या शेटच्या दुकानांत बसून कांहीं काम करीत होता; इतक्यांत हरमन दुकानांत आला आणि जेम्स जवळ येऊन ह्मणाला, जेम्स, येथून सूर्य किती दूर आहे हें तुला माहीत आहे? गरीब बिचार, जेम्स ज्यानें ह्या विषयीं कधीं ही कांहीं विचार केला नव्हता तोहा प्रश्न ऐकून अति-

शय चकित ( आश्चर्य भरित ) झाला तो थोडावेळ हरमनकडे एक सारख्या नजरेनें पाहून नम्रतेनें ह्मणाला 'हरमन दादा' त्याविषयीं मला कांहीं माहिती नाहीं पण तो किती दूर असेल बरें? हरमन ह्यानें जेम्सची थट्टा करण्याकरितां, व त्याच्या अज्ञानपणास हसून, आपली हुषारी दाखविण्याकरितां हा प्रश्न केला होता. तो हा साधा जबाव ऐकून आणि जेम्स ह्याचा भोळा परंतु नम्र स्वभाव पाहून त्याच्यानें जेम्सने विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर दिल्याशिवाय राहवलें नाहीं तरी तो गर्वानेंच ह्मणाला ' मूर्खा ' सूर्य येथून किती दूर आहे इतकें ही तुला माहीत नाहीं? तो ह्या पृथ्वीपासून नऊ कोटी पन्नास लक्ष मैल लांब आहे गरीव विचारा जेम्स ह्यानें यावर कांहीं उत्तर दिलें नाहीं तथापि हरमन ह्याच्या बोलण्या घर लक्ष देऊन त्यानें ते शब्द चांगल्या रीतीनें आपल्या ध्यानांत ठेविले; आणि रात्रीं काम करणें बंद झाल्यावर खगोल विद्येचीं मूलतत्वें ह्या नांवाचें आपल्या शेटचा मुलगा हरमन ह्याचें पुस्तक घेऊन त्यानें त्या विषयाची माहिती मिळविण्याची सुरवात केली. त्या लहान पुस्तकांतील जे कांहीं तो वाची त्यावर इतकें लक्ष ठेवी आणि त्यांत लिहिलेली माहिती मिळविण्या ारितां इतका उत्सुक होता कीं, जें कांहीं रात्रीं वाचलें तें ए ानें अक्षरशः ध्यानांत ठेविलें ह्याप्रमाणें मध्य रात्र

पर्यंत वाचून तो निजावयास गेला पण त्यावेळीं त्याच्या मस्तकांत ग्रह, तारे, चंद्र, सूर्य, धूमकेतु ह्यांचेच विचार खेळत होते.

दुसऱ्या दिवशीं हा मेहनती मुलगा दुकानांत आपलें काम करीत असतां त्याच्या मनांत कांहीं नवाच विचार घोळत होता, आणि त्या विचारा मुळें खिन्न होऊन तो आपल्या मनांत ह्मणे ‘ हाय हाय ! ’ माझ्या शेटच्या मुला प्रमाणें शाळेंत जाऊन मला विद्या प्राप्त होणार नाहीं ! कारण तसें मजमध्यें सामर्थ्य नाहीं ! ! पुन्हा तो मनास धीर देऊन ह्मणत असे ‘कांहीं चिंता नाहीं, हरमन रात्रीं निजल्यावर त्याचें पुस्तक घेऊन मी शिकेन’ ह्या प्रमाणें तो विचार करीत आहे तों हरमन दुकानांत आला आणि जेम्स जवळ येऊन ह्मणाला, जेम्स ह्या पृथ्वीचा घेर किती आहे? जेम्स किंचितही न अडखळतां लागलाच बोलला पंचवीस हजार मैल. ’

हरमन जो फारच हेवेखोर आणि पाजी स्वभावाचा होता आणि ज्याला दुसऱ्याचें चांगलें करण्यापेक्षां वाईट करणें चांगलें वाटत असे, तो आपल्या प्रश्नाचा ह्या प्रमाणें हजर जवाब ऐकून अतिशय चकित झाला आणि गर्वानेंच ह्मणाला ‘जेम्स तूं इतका विद्वान् केव्हांपासून झालास तें तर मला सांग?’

जेम्स ह्मणाला ‘ रात्रीं मी तुझें पुस्तक घेऊन वाचलें होतें तेणेकरूनच मलाही माहिती झाली आहे. ’

हरमन ह्मणाला ' वाहवा, हा तूं चांगला धंदा मांडला आहेस माझ्या पुस्तकास हात लावण्याचा अधिकार तुला कोणी दिला ? पुन्हा जर माझ्या कोणत्याही पुस्तकास हात लावलास तर संभाळून रहा. '

जेम्स ह्मणाला ' दादा मी आपलें सर्व काम पूर्ण केल्या नंतर रात्रीं तें पुस्तक वाचलें होतें आणि मी तें कांहीं खराब केलें नाहीं. '

हरमन अधिक रागावून ह्मणाला या उपर माझ्या पुस्तकास तूं कधीं हात लावू नको आणि तुला पुन्हा सांगतों कीं, जर कदाचित् माझें एखादें पुस्तक तुझ्या हातांत कधीं पाहिलें तर तुझी खात्री केल्याशिवाय राहणार नाहीं.

आपल्या अभ्यासांत न येणारा अडथळा आलेला पाहून जेम्स फारच दिलगीर झाला. स्वतःच्या खर्चानें पुस्तक घेण्यास त्याजवळ पैसे नव्हते. आणि तें लहान पुस्तक:— जें वाचण्यांत जेम्सला आनंद वाटत होता तें पुस्तक त्याला वाचावयास देईल असा कोणी त्याच्या लक्षांत नव्हता ह्मणून तो नम्रतेनें आर्जव करून ह्मणाला ' हरमन जर तुझें पुस्तक तूं मला वाचावयास देशील तर तुझा उपकार मी कधीं विसरणार नाहीं. आणि माझ्या जिवा पेक्षांही अधिक त्याचा (पुस्तकाचा) संभाळ करीन. '

हें ऐकून हरमन ह्मणाला 'नाहीं नाहीं तूं माझ्या भरंवशावर राहूं नको. मी जें तुला सांगितलें आहे तें चांगलें लक्षांत ठेव नाहीं तर तूं पस्तावल्या शिवाय राहणार नाहींस' इतकें बोलून निघून गेला.

हरमनचा हेवरेखोर आणि पाजी स्वभाव जेम्स ह्याला माहीत होता, ह्यामुळें जास्त बोलण्यानें तो पुस्तक देणार नाहीं अशी त्याची खात्री होती, ह्मणून हरमन निजल्यावर गुप्तरीतीनें पुस्तक घेऊन वाचण्याशिवाय दुसरा उपाय नव्हता तथापि जेम्सला एकमार्गी व प्रामाणिक असल्यामुळें, ह्यारीतीनें हरमन ह्यास ठकवून त्याचें पुस्तक त्याची आज्ञा नसतां चोरून घेऊन वाचावें हें त्याला नीट वाटेना.

त्यानें जें पुस्तक वाचलें होतें तसें पुस्तक मिळण्याचा कांहीं योग्य उपाय शोधण्याकरितां त्यानें पुष्कळ विचार केले, परंतु ते सर्व व्यर्थ गेले.

हल्लीं जेम्स ह्याला त्या कारखान्यांत येऊन दोन वर्षें झालीं होतीं, इतक्या काळांत तो चपळ व मेहनती असल्यामुळें सुतार कामासंबंधीं सर्व कामांत तो बराच हुषार झाला होता.

एके दिवशीं नित्याप्रमाणें पुस्तक मिळविण्याचा विचार करीत असतां त्याला एक उपाय सुचला कीं, कोणाचें कांहीं काम करावयाचें पतकरून तें दररोज संध्याकाळीं केल्य

त्याच्या मेहनतीच्या आलेल्या पैशांतून पाहिजे तें पुस्तक घेतां येईल. इतक्यांत त्याला आठवण झाली कीं ह्या मोहल्यांतील एका घराच्या खिडक्या मोडून फारच खराब झाल्या आहेत त्या नीट करण्यास जर तो घरधनी आज्ञा देईल तर थोडेसे पैसे मिळतील.

हा विचार सुचल्या बरोबर लागलाच तो त्या घराकडे गेला आणि दरवाजा ठोकूं लागला; तेव्हां एका मनुष्यानें दार उघडलें आणि किंचित् चकित होऊन ह्मणाला 'कां शेट तुह्मांला काय पाहिजे?'

जेम्स ह्मणाला, 'महाराज तुमच्या घराच्या खिडक्या मोडल्या आहेत याकरितां तुह्मी आज्ञा द्याल तर मी त्या थोडक्या खर्चांत नीट करून देईन.'

तो मनुष्य त्या घराचा धनीच होता. तो जरा हंसून ह्मणाला कीं, ह्या 'खिडक्या मोडून पुष्कळ दिवस झाले आहेत; आणि आतां जर तुह्मी त्या थोडक्या पैशांत नीट करून देता तर त्यांत मला कांहीं अडचण नाहीं; परंतु कृपा करून आपण कोण आहां व आपलें नांव काय ते सांगा.'

जेम्स ह्मणाला महाराज, माझें नांव जेम्स वालेस असें आहे मि० लीच्या कारखान्यांत मी सुताराचा धंदा शिकण्यास उमेदवार राहिलों आहें. तो घरधनी किंचित् साश्चर्य होऊन

ह्मणाला ‘ दादा तुह्मी मि० लीकडे उमेदवार आहां तर तो तुह्मांला खाणें पिणें व कपडे वगैरे देत असेलच, असें असतां दुसरें काम करण्याचें कारण काय? शांततेनें तुमची सर्व हकीगत मला सांगा, आणि जर ती मला योग्य दिसली तर माझ्यानें होईल तितकी मदत तुह्मांला करीन. ’

हें ऐकून जेम्स ह्यानें हिमत धरून आपला सर्व उद्देश त्या गृहस्थास कळविला आणि अतिशय नम्रतेनें खिडक्या नीट करण्यास हुकूम मागितला.

हा गृहस्थ फारच मायाळ आणि श्रीमंत परंतु अगदीं साधा होता. जेम्स ह्याची हकीकत ऐकून त्याच्या मनांत दया उत्पन्न झाली व त्यानें त्या मुलास मदत करण्याचा निश्चय केला नंतर तो सद्गृहस्थ लागलाच मि० लीकडे जाऊन त्यास थोडें द्रव्य देऊन जेम्स ह्याला त्याच्या जवळून आपल्या ताब्यांत घेतला आणि ज्या शाळेंत हरमन ली अभ्यास करीत होता त्या शाळेचा पैसा भरून जेम्स ह्याला शिकावयास पाठविलें.

पुढें जेम्स आपल्या दीर्घोद्योगानें उत्तम विद्या शिकून थोर पदवीस चढला व हरमन गर्विष्ठ स्वभावानें व आळसानें अगदींच निकृष्टावस्था पावला. सारांष हे वैरी आहेत.

समाप्त.